# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०८ मार्च, २०२३ / फाल्गुन १७, १९४४ (शके)**

**मुख्यमंत्री } यांचे प्रभारी विभाग**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५२**

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील मोहने येथील एन.आर.सी. कंपनीकडून थकीत मालमत्ता कराची रक्कम वसूल करण्याबाबत

**(१) * १७६१८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १६५२३ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील मोहने येथे बंद असलेल्या एन.आर.सी. कंपनीकडून मालमत्ता करापोटी माहे मार्च, २०२२ अखेर व्याजासह एकूण थकीत मालमत्ता कराची रक्कम रुपये १५२,७२,९४,५२९/- इतकी येणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालमत्ता कराची थकीत रक्कम कंपनीच्या ७/१२ वर नोंद करणेकामी व ७/१२ महानगरपालिकेच्या नावे नोंदविणेबाबत तहसिलदार, कल्याण यांना दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी महानगरपालिकेमार्फत कळविण्यात येवूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर कंपनीकडून थकीत मालमत्ता कराची रक्कम महानगरपालिकेस येणे बाकी असताना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने एन.आर.सी. कंपनीच्या ७/१२ च्या उताऱ्यावर महानगरपालिकेचा बोजा न टाकण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपनीच्या मालकीच्या ४२५ एकर जमिनींपैकी किती भूखंडावर महानगरपालिकेचा बोजा चढविण्याची कार्यवाही करण्याबाबत तसेच सदर कंपनीकडून थकीत मालमत्ता कराची रक्कम वसूल करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

- नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल यांचा दिनांक १३/०३/२०२० रोजीचा आदेश व नॅशनल कंपनी लॉ अपीलेट ट्रिब्युनल यांच्या दिनांक २०/१२/२०२२ रोजीच्या आदेशाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी

दिल्ली येथे दाखल दावा क्र. ४९५/२०२३ मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०३/०२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये खारीज केल्याने, दिनांक १३/०३/२०२० रोजी पूर्वीची मालमत्ता कराची रक्कम कंपनीकडून देय होत नाही.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

- मालमत्ता कराच्या थकीत रकमेपोटी कंपनीचा सात-बारा महानगरपालिकेच्या नावे नोंदविणेबाबत तहसिलदार, कल्याण यांना दिनांक ३१/०३/२०१७ व दिनांक १४/०७/२०१७ रोजी तसेच, उपविभागीय अधिकारी, कल्याण यांना दिनांक १०/०४/२०१७ च्या पत्रान्वये महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
- तथापि, मालमत्ता कराची थकीत रक्कम कंपनीच्या ७/१२ वर नोंद करणेबाबत महानगरपालिकेने तहसिलदार, कल्याण यांना कळविले नसल्याने सदर कार्यवाही झालेली नाही.

(४) व (५) • मे. एन.आर.सी. कंपनीने मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल एसएलए-१४४१९/२००६ मध्ये दिनांक १३/११/२००६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कंपनीने मा.दिवाणी न्यायालय, कल्याण येथे वेळोवेळी दाखल केलेल्या म्युनिसिपल अपिलांचा अंतिम निर्णय होईपर्यंत कराच्या वसुलीसाठी घातलेल्या प्रतिबंधात्मक आदेशामुळे मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही करता आलेली नाही.

- सदर कंपनीकडून मालमत्ता कराची येणे रक्कम महानगरपालिकेने निर्लेखित केलेली नाही.
- तथापि, सदर कंपनीने दिनांक १३/०३/२०२० ते दिनांक ३१/०३/२०२३ अखेर पर्यंतची मालमत्ता कराची रक्कम रुपये १,६०,२१,७९१/- महानगरपालिकेत जमा केलेली आहे.
- त्यामुळे सदर प्रकरणी कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपळखुटी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथे वाहनचालकांची आर्थिक लूट करणाऱ्या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२) * १७०५३ डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळखुटी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील वाहन चेकपोस्टवर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी वाहन चालकांना मारपीट करुन त्यांचेकडून बळजबरीने पैसे वसुल करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गैरप्रकारात या ठिकाणच्या चेकपोस्टवरील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील निरीक्षक (इन्स्पेक्टर) यांचा व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाहनचालकांची आर्थिक लूट करणाऱ्या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन वाहनचालकांची होणारी आर्थिक लूट थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

तथापि, "महाराष्ट्र सीमा तपासणी नाक्यावर दरमहा लाखोंची उलाढाल" अशा आशयाची बातमी दिनांक २९/१२/२०२२ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांच्या अहवालानुसार पिंपळखुटी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील चेकपोस्टवर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून असा गैरप्रकार घडल्याचे अथवा त्यामध्ये सहभाग असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या निवासाची आश्रय योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(३) * १७२३७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील एकूण २९ हजार ६१८ सफाई कामगारांपैकी केवळ ५ हजार ५९२ सफाई कामगारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेने सेवानिवासस्थाने दिले असल्याने घराच्या प्रतिक्षेत असणाऱ्या उर्वरित सफाई कामगारांनी घरांच्या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच सफाई कामगारांसाठी उभारण्यात येणाऱ्या मालकी हक्कांच्या घरांच्या योजनेचे काम संथगतीने सुरु असल्याप्रकरणी दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास सफाई कामगारांनी मुंबईतील आझाद मैदानात साखळी उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सफाई कामगारांच्या सद्य:स्थितीत मोडकळीस आलेल्या चाळी व इमारतींचा (वसाहतींचा) आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकास करुन अंदाजे १४००० घरे बांधण्याची महानगरपालिकेमार्फत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांकडून शहरातील घाण साफ करणे, गटार साफ करणे इ. कामे केली जात असून सफाई कामगारांच्या आरोग्याकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कचरा साफ करणे, कचरा गाडीत भरणे व कचरा वेगळा करणे याकरीता परदेशात वापरण्यात येणारे तंत्रज्ञान बृहन्मुंबई महानगरपालिकेत अंमलात आणण्याबाबतची मागणी अनेक सेवाभावी संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी राबविण्यात येणारी आश्रय योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत तसेच सफाई कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे मिळण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांनी दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी आझाद मैदान येथे साखळी उपोषण केले होते, हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांना आश्रय योजनेंतर्गत सेवानिवासस्थानांच्या पुनर्विकासाचे काम प्रगतीपथावर असून, सदर पुनर्विकासांतर्गत अंदाजे १२ हजार सेवासदनिका उपलब्ध होणार आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांना सफाईची कामे करण्याकरीता मास्क, परावर्तित जॅकेट, हातमोजे, गमबुट, सॅनिटायझर व साबण अशी सुरक्षा साधने देण्यात येत आहेत.

सदर सफाई कामगारांची वर्षातून दोन वेळा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात विभागवार आरोग्याची चाचणी करुन उपचार केले जातात, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना मोफत सदनिका देण्याच्या दिनांक १२ जून, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक १६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या शासन आदेशानुसार सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महालक्ष्मी (मुंबई) येथील रेसकोर्स भूखंडाचे नूतनीकरण करुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'थीम पार्क' उभारण्याबाबत

**(४) * १६९५६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सचिन अहिर, श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहरातील सुमारे ४ हजार भूखंड भाडेपट्टा कराराने दिले असून यातील अनेक भूखंडांचे भाडेपट्टा (लीज) करार सन २०१३ मध्ये संपुष्टात आल्यानंतर गत दहा वर्षात सदरहू भूखंडाच्या भाडेपट्टा कराराचे नुतनीकरण झाले नसल्यामुळे तसेच भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घेतले नसल्यामुळे सदरहू भूखंडावर अनधिकृत बांधकाम होऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेचा रुपये ५ कोटींचा महसूल बुडाला असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंडांपैकी महालक्ष्मी (मुंबई) येथील रेसकोर्स भूखंडाचे नूतनीकरण करण्यासह आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'थीम पार्क' उभारण्याचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिका सभागृहात मंजूर करुन शासनाकडे निर्णयासाठी पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेऊन महालक्ष्मी (मुंबई) येथील रेसकोर्स भूखंडाचे नूतनीकरण करण्यासह आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'थीम पार्क' उभारण्याबाबत तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेचा बुडीत महसूल व्याजासहित वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकूण ४१७७ भूभाग, विविध व्यक्ती/संस्था/विश्वस्त संस्था/ शैक्षणिक संस्था यांना मक्त्याने दिलेले आहेत. त्यातील भाडेपट्टा करार संपुष्टात आलेल्या एकूण ३२३ भूभागांपैकी ८९ भूभागांच्या मक्ता कालावधीचे नुतनीकरण करण्यात आले असून, उर्वरित भूभागांच्या मक्ता नुतनीकरण करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्यामुळे सदर भूखंडाचा ताबा महानगरपालिकेने घेतलेला नाही. महानगरपालिकेच्या ठराव क्रमांक १६०९, दिनांक १८/०५/२०२० सह महानगरपालिका ठराव क्र. ४३१, दिनांक ०९/०७/२००२ च्या मंजूर धोरणानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मत्ता भूभागांच्या भाडेपट्टा कालावधीचे नुतनीकरण करण्यात येते. तसेच, शासनाच्या मालकीचे अनुसूची 'डब्ल्यू' मधील भूभागांच्या भाडेपट्टा कालावधीचे नुतनीकरण हे शासन निर्णय क्र. बीएमसी-२५१६/प्र.क्र.२८०/नवि-२१, दिनांक १५/०३/२०१७ अन्वयेच्या धोरणानुसार करण्यात येते. उक्त दोन्ही धोरणांनुसार भाडेपट्टा कालावधीचे नुतनीकरण करण्यात येणाऱ्या भूभागांवरील अनधिकृत बांधकामांबाबत दंड आकारणी करुन अटीभंगाच्या सूचना (नोटीस) दिल्यापासून १ वर्षाच्या कालावधीत अनधिकृत बांधकामे नियमित/निष्कासित करणे बंधनकारक आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आंतरराष्ट्रीय दर्जाचे संकल्प उद्यान (थीम पार्क) विकसित करण्याबाबतचा निर्णय दिनांक १५/०५/२०१३ रोजीच्या मुंबई महानगरपालिका गटनेत्याच्या सभेत ठरावाच्या सूचनेद्वारे घेण्यात आला. सदर निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने शासनास कळविला आहे.
(३) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या अनुसूची "डब्ल्यू" मध्ये नमूद केलेल्या मालमत्तांच्या भूभागांचे नुतनीकरण करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव दिनांक २७/०९/२०१६ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत विचारात घेण्यात आला होता.त्यानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ९१ ब मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. तद्नंतर अनुसूची डब्ल्यूमधील मालमत्तांच्या भूभागांचे नुतनीकरण करण्याबाबत दिनांक १५/०३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये भाडेपट्टा नुतनीकरणाचे धोरण जाहीर करण्यात आले आहे. तथापि, सदर धोरण करतांना महालक्ष्मी रेसकोर्स, विविध जिमखाने व तत्सम भूभागांबाबत आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार, महालक्ष्मी रेसकोर्स, विविध जिमखाने व तत्सम भूभागांबाबत पुढील कार्यवाही सुरु असून सदरील भूभागांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे.

महालक्ष्मी रेसकोर्स, विविध जिमखाने व तत्सम भूभागांचे नुतनीकरण करण्यासाठी पुढील धोरण अस्तित्वात येईपर्यंत महसूल वसुलीच्या अनुषंगाने नगरविकास विभागाच्या दिनांक ०७/०६/२००७ च्या शासन आदेशान्वये, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भाडे तत्वावर दिलेल्या अनुसूची "डब्ल्यू" मध्ये विर्निदिष्ट केलेल्या मालमत्तांची थकीत रकमांची वसुली जुन्याच दराने करण्यात यावी व फरकाची रक्कम व्याजासह भरण्यात येईल, असे हमीपत्र संबंधितांकडून प्राप्त करुन थकीत रकमांची वसुली करणेबाबत

दिनांक २८/०३/२०१४, दिनांक २८/०९/२०२२ व दिनांक २१/१०/२०२२ च्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेला सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार, मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि., महालक्ष्मी रेसकोर्स यांचेकडून करावयाच्या भाडे वसुलीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १०/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये हमीपत्र सादर करणेबाबत मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि., महालक्ष्मी रेसकोर्स यांना कळविले असून याअनुषंगाने पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापकांची नेमणूक करुन शिक्षकांची भरती करण्याबाबत

**(५) * १७४४४ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५५५६ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून महानगरपालिकेच्या २९ शाळांमध्ये मुख्याध्यापक नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याध्यापकांच्या रिक्त पदांमुळे शालेय स्तरावर निर्णय घेण्यास अडचणी येत असून महत्त्वाचे निर्णय घेण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिका प्राथमिक शाळांतील मुख्याध्यापकांच्या २९ रिक्त पदांवर पदोन्नती देण्याकरीता सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास पदोन्नती समितीने मान्यता दिली असून मुख्याध्यापक पदोन्नतीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापकांची नेमणूक करुन शिक्षकांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, किती कालावधीत मुख्याध्यापकांची रिक्त पदे भरण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे

- नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देणेबाबतची कार्यवाही महानगरपालिकेत प्रस्तावित असल्याने, तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठ शिक्षकांना प्रभारी मुख्याध्यापक पदाचा कार्यभार सोपविण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

- नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातील २९ प्राथमिक शिक्षकांना मुख्याध्यापक पदावर दिनांक ३०/१२/२०२२ च्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(४) • नवी मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ३०/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये, २९ मुख्याध्यापकांची पदे भरण्यात आली आहेत.

• नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व शिक्षण विभागाच्या आकृतीबंधास दिनांक १५/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शिक्षकांची पदे सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर भरण्यात येतील, असे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यसेवा परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने घेण्याच्या निर्णयाबाबत

**(६) * १६९४९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे (एमपीएससी) राज्यसेवा परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने घेण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सन २०२३ पासून करण्यात येणार असल्यामुळे सदरहू निर्णयाच्या विरुध्द राज्य सेवा परीक्षेची तयारी करणारे पुण्यातील शेकडो उमेदवार आंदोलन करण्यासाठी रस्त्यावर उतरले असल्याची घटना दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या अभ्यासक्रमानुसार तयारी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम लागू करणे अडचणीचे व अन्यायकारक ठरत असल्याने याविरोधात पुणे येथे एमपीएससी परीक्षांची पूर्व तयारी केलेल्या लाखो विद्यार्थ्यांनी परीक्षेचा नवा पॅटर्न लागू करण्यापूर्वी परीक्षार्थींना सहा महिने वेळ मिळावा अशी मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आल्यास राज्य सेवा परीक्षेची तयारी करणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यसेवा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी राज्यसेवा परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने घेण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सन २०२५ पासून करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा मुख्य परीक्षा सुधारित परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार वर्णनात्मक पध्दतीने सन २०२३ ऐवजी सन २०२५ पासून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बार्टीच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(७) * १७२८२ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५८६८ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दहावीच्या परीक्षेत ९० टक्के अथवा त्यापेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण होणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मेडीकल अथवा इंजिनिअरिंगच्या प्रवेश परीक्षेसाठी तसेच कोचिंग क्लासेसमधून तयारी करुन घेण्यासाठी रुपये दोन लाखांचे अनुदान देण्याकरीता शासनाने बार्टीच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१ मध्ये सदरहू योजना सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर ४५०० विद्यार्थ्यांनी सदर योजनेंतर्गत अर्ज केले असून सदरहू योजनेचा प्रत्यक्ष लाभ विद्यार्थ्यांना मिळाला नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना क्लासेस सोडावे लागले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दहावीच्या (एस.एस.सी.) परिक्षेत ९० टक्के अथवा त्यावरील गुणांसह उत्तीर्ण होणाऱ्या अनुसूचीत जातीतील गरीब विद्यार्थ्यांना जेईई, नीट, सीईटी सारख्या परिक्षांच्या तयारीसाठी वर्ग ११ वी व १२ या दोन वर्षात प्रति विद्यार्थी प्रत्येकी एक लक्ष असे एकूण रुपये २ लक्ष देण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) कार्यालयाने शासनास सादर केला असून सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन विद्यार्थ्यांना लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) दहावीच्या (एस.एस.सी.) परिक्षेत ९० टक्के अथवा त्यावरील गुणांसह उत्तीर्ण होणाऱ्या अनुसूचीत जातीतील गरीब विद्यार्थ्यांना जेईई, नीट, सीईटी सारख्या परिक्षेच्या तयारीसाठी वर्ग ११ वी व १२ या दोन वर्षात प्रति विद्यार्थी प्रत्येकी एक लक्ष असे एकूण रुपये २ लक्ष देण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी) कार्यालयाने शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिका क्षेत्रांतर्गत मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) * १७३६२ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका क्षेत्रात दर्जेदार रस्ते नसून साफसफाईची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून दर्जाहीन एलईडी पथदिवे व अमृत योजनेंतर्गत विविध पाणीपुरवठ्याच्या योजनांवर रुपये ९३ कोटी तर भूमिगत गटार योजनेवर रुपये ८९ कोटी रुपये खर्च करण्यात आले असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला महानगरपालिकेने विकास कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करुनही नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा मिळत नसल्याने याप्रकरणी नागरिकांनी अकोला महानगरपालिकेकडे तक्रारी करुनही महानगरपालिका प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाकडून बिल्डरांच्या अपार्टमेंटसाठी रस्ता, सर्व्हिस लाईन इ. कामांसाठी रुपये ७० लाखांचा अनावश्यक खर्च केल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला शहराकरीता मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अकोला महानगरपालिकेस विविध योजनांतर्गत रस्त्यांच्या कामांकरीता रुपये ४२.८९ कोटी एवढा निधी प्राप्त झाला असून पूर्ण झालेल्या व सुरु असलेल्या कामांचा दर्जा राखण्यासाठी आवश्यक काळजी अकोला महानगरपालिकेमार्फत घेण्यात येत आहे.

अकोला महानगरपालिकेद्वारा मुख्य रस्त्यांची दैनंदिन साफसफाई व कचरा उचलण्याची प्रक्रिया प्रभावीपणे व नियमितपणे करण्यात येत असून त्यावर क्षेत्रिय अधिकारी यांचे दैनंदिन नियंत्रण आहे.

अकोला महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रम असलेल्या ई.ई.एस.एल. कंपनीच्या माध्यमातून पथदिवे बसविण्याचा करारनामा करण्यात आला असून लावलेल्या पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती कंपनीला ७ वर्षापर्यंत करावयाची असून त्यानुसार पथदिव्याचे देखभाल व दुरुस्तीचे काम ई.ई.एस.एल. कंपनीकडून सुरु आहे कंपनीमार्फत दर्जाहीन एल.ई.डी. पथदिवे लावण्यात आलेले नाहीत.

केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अकोला शहराच्या पाणीपुरवठा व मलनि:स्सारण प्रकल्पास मंजुरी प्रदान करण्यात आली असून पाणीपुरवठा योजनेवर रुपये १०८.८८ कोटी व मलनि:स्सारण प्रकल्पावर रुपये ८०.६४ कोटी एवढा निधी खर्च करण्यात आला असून प्रकल्पातील बहुतांशी उपांगांची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

(२), (३), (४) व (५) अकोला महानगरपालिकेद्वारा विविध विकास कामांचा आराखडा तयार केल्यानंतर नागरिकांकडून प्राप्त तक्रारी विचारात घेऊन प्राप्त निधीच्या अनुषंगाने अत्यावश्यक कामे पूर्ण करण्यात आली असून प्रशासनाद्वारे आवश्यकतेनुसार शहरांतर्गत सार्वजनिक विद्युत व्यवस्था, पाणीपुरवठा व मलनिःस्सारण प्रकल्पाची कामे वेळोवेळी पूर्ण करण्यात येतात व प्रलंबित कामांसाठी नियोजन करण्यात आले आहे.

अकोला महानगरपालिकेमार्फत प्रत्यक्ष सर्वेक्षण करून क्षेत्रिय अधिकारी यांचे अहवालानुसार शहरातील रस्ता व सर्व्हीस लाईनची कामे करण्यात आलेली असून बिल्डरांच्या रस्ता / सर्व्हीस लाईन ई. कामांसाठी अनावश्यक खर्च करण्यात आला नसल्याचे अकोला महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## पुणे येथील भिडेवाड्यात राष्ट्रीय स्मारक उभारुन शाळेची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(९)** * **१७०६९ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील भिडेवाड्यातील मुलींच्या पहिल्या शाळेस १७४ वर्षे पूर्ण होऊन सद्य:स्थितीत शाळेच्या भिंती जीर्ण, मोडकळीस आलेले खांब, उजाड माळवद आणि अर्धवट राहिलेले पत्रे यामुळे शाळेची दुरवस्था झाली असून शाळेची इमारत कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असतानाही सदर वास्तूचे राष्ट्रीय स्मारक व शाळेची पुनर्बांधणी करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाड्याच्या जागी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक तसेच शाळेच्या पुनर्बांधणी संदर्भात कामगार नेते डॉ.बाबा आढाव तसेच अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी लेखी निवेदने, आंदोलने करुन शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावित्रीबाई फुले राष्ट्रीय स्मारक उभारण्याच्या संदर्भात वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्याला अनुलक्षून पुढील दोन महिन्यांत गाळेधारकांचे प्रश्न मार्गी लागून नवीन वास्तूत पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान नागपूर येथे संपन्न झालेल्या विधानसभेच्या अधिवेशनात दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे येथील भिडेवाड्यात राष्ट्रीय स्मारक व शाळा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, राष्ट्रीय स्मारकाच्या उभारणीच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदरहू स्मारक किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) भिडेवाडा, बुधवार पेठ, सीटी स.नं.२५७, येथे महात्मा ज्योतीबा फुले यांनी मुलींची पहिली शाळा १८४८ मध्ये सुरू केली होती.

सदर मिळकतीच्या जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असून, सदर जागा अद्याप पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली नसल्याने कोणत्याही प्रकारचे दुरूस्तीचे काम अद्यापर्यंत करण्यात आलेले नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक २१/१२/२०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी भिडेवाडा येथे स्मारक करण्याबाबत मिळकतीचे मालक/ विकासक /भाडेकरू यांच्या समवेत बैठक घेवून त्यांच्या पुर्नवसनासह स्मारकाचा आराखडा तयार करून शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे व आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना निदेश दिलेले आहेत.

भिडेवाडा वास्तु प्रकरणी आयुक्त, पुणे महानगरपालिका, जिल्हाधिकारी, पुणे व भिडेवाडा मिळकतीचे मालक, विकसक व भाडेकरू (निवासी व व्यवसायिक) यांच्यामध्ये बैठका घेण्यात आलेल्या असून तोडगा काढण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

भिडेवाडा या मिळकतीच्या भूसंपादनाची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरू असून न्यायालयीन दाव्यांमुळे सदरचे भूसंपादन प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धाराशिव नगरपरिषद हद्दीतील अकृषी आकारणी न भरता अनधिकृत प्लॉट पाडून शासनाचा महसूल बुडविल्याबाबत

**(१०)** * **१७७७६ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नंबर ३६५/५ (कृषी/विकास नसलेले क्षेत्र) (Agricultural/Non Development Zone) मधील क्षेत्र ४६ आर. श्री.शिवकुमार शिवपूजे व श्री.नरसिंग जेठेवाड यांनी नगरपरिषदेकडून रेखांकनाला मंजूरी न घेता व महसूल विभागाचे अकृषी आकारणी न भरता अनधिकृत प्लॉट पाडले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमबाह्य व बेकायदेशीर ८अ नक्कल अदा केल्याबाबत धाराशिव नगरपरिषदेचे तत्कालीन मुख्याधिकारी, नगर अभियंता व इतर कर्मचारी यांच्यावर चौकशी करुन गुन्हे दाखल करण्याची मागणी दिनांक २९ जानेवारी, २०२१ रोजी अर्जदाराने करुनही निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपीचा बचाव करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय संरक्षण देत असल्याने अर्जदाराने महाराष्ट्र शासन दप्तर दिरंगाई कायदा २००६ शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्याच्या तरतूदींकडे लक्ष वेधण्यासाठी पुन्हा दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाचा महसूल बुडाला असल्याने ७ दिवसात खुलासा सादर करण्याचे आदेश देऊनही दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजीपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आर्थिक लाभापोटी गैरव्यवहार करुन शासनाचा महसूल बुडविल्याप्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही,

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी तत्कालीन मुख्याधिकारी, धाराशिव नगरपरिषद यांच्याकडून दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये, तसेच दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला व त्यानंतर दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी कारणे दाखवा नोटीशीन्वये ७ दिवसांत खुलासा मागविण्यात आला. त्यानुसार तत्कालीन मुख्याधिकारी, धाराशिव नगरपरिषद यांचा दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजीचा खुलासा प्राप्त झाला आहे.

(५) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, तत्कालीन मुख्याधिकारी, धाराशिव नगरपरिषद यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी सहायक निबंधक, वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना सदर प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत दिनांक २०/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सद्य:स्थितीत चौकशी सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## दिव्यांगांच्या शाळा व कर्मशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०० टक्के वेतन देवून बी.पी.एड. वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(११) * १७२१३ श्री.कपिल पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रामदास आंबटकर, श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५४३८ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२३ शाळा व कर्मशाळांमधील शिक्षक/कर्मचाऱ्यांना १०० टक्के वेतन अनुदानाचा शासन निर्णय दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी सामाजिक न्याय विभागाने निर्गमित केला असून सदर शासन निर्णयानुसार शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यासंबंधी पद मान्यतेचा उल्लेख न केल्यामुळे राज्यातील शाळा व कर्मशाळांमधील शिक्षक/कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पुन्हा दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करून १०० टक्के वेतन अनुदान लागू न करता पुन्हा ५० टक्केच वेतन अनुदान लागू करून शिक्षक/कर्मचाऱ्यांवर अन्याय केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबतचा प्रस्ताव राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ विचारार्थ सादर करण्यात आला असून तद्नंतर दिव्यांगांच्या अनुदानित विशेषशाळा संलग्न यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याबाबत दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिनांक २ मार्च, २०२२ रोजी शासनास सादर केलेला अहवाल मा.मुख्यमंत्री यांनी प्रतिक्षाधीन ठेवला असून सदरहू अहवालावर मा.मंत्रिमंडळाचा निर्णय झाला आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, दिव्यांग शाळेतील शारीरिक शिक्षकांच्या विशेष प्रयत्नांचा विचार करून सामान्य शाळेतील शारीरिक शिक्षकांप्रमाणे दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी निवेदने दिली असून राज्यातील दिव्यांगांच्या १२३ शाळा व कर्मशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ५० टक्के वेतनावरुन १०० टक्के वेतन देण्याच्या मागणीकरीता दिव्यांग (अपंग) शाळा व कर्मशाळा कर्मचारी कृती समितीच्या नागपूर शिक्षक मतदार संघातील लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वात दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे मोर्चा आयोजित करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सुधारित शासन निर्णय निर्गमित करुन दिव्यांगांच्या १२३ शाळा व कर्मशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ पासून १०० टक्के वेतन देण्याबाबत, पदवीधर बीपीएड वेतनश्रेणी लागू करणेबाबत तसेच दिव्यांगांच्या विशेषशाळा व कर्मशाळांचे पगार माध्यमिक शाळांप्रमाणे १ तारखेला करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती (समान संधी) हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग अधिनियम, १९९५ मधील तरतूदींनुसार राज्यातील दिव्यांग क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या विनाअनुदान तत्वावरील शासनमान्य खाजगी संस्थांच्या दिव्यांग निवासी/अनिवासी शाळा व कर्मशाळांना राज्य मंत्रीमंडळाने अनुदान तत्वावर आणण्याबाबत इतर नियमासहीत पुढीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

अ) स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या विनाअनुदान तत्वावरील "अ" श्रेणीतील १२३ दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांना १०० टक्के अनुदान देण्यास मान्यता देण्यात यावी.

आ) अनुदान मंजूर करण्यापूर्वी ज्या विशेष निवासी शाळा/ कर्मशाळा शासनाच्या अनुदानाबाबतच्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करतील अशा शाळा व कर्मशाळांनाच अनुदानासाठी पात्र ठरविण्यात यावे.

तद्नंतर वित्त विभागाच्या उच्चस्तर सचिव समितीच्या दिनांक १६/१०/२०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार १) दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांसाठी एकूण २४६४ नवीन पदे निर्माण करण्यास शासन निर्णय दिनांक ८/०४/२०१५ मधील तरतूदीनुसार खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली २) शासन निर्णय दिनांक १८/०८/२००४ च्या विवरणपत्र अ मधील विहित केलेल्या अटीनुसार पदे भरण्यात येतील ३) वरील पदनिर्मितीस उच्चस्तर सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून सदर पदे ५० टक्के अनुदान तत्वावर आणण्यास एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने पदनिर्मितीकरीता शासन निर्णय दिनांक ०६/११/२०१८ निर्गमित करण्यात आला आहे. उक्त सर्व शाळा/ कर्मशाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आजपर्यंत वेतन सुरु आहे.

(३) मा.अध्यक्ष, राज्य वेतन सुधारणा समिती (बक्षी समिती) यांच्याकडे दिनांक २५/०९/२०१८ रोजी बैठक झाली. वेतन त्रुटी उच्चस्तर समितीचा अहवाल खंड-२, दिनांक ९/०२/२०२१ रोजी वित्त विभागास सादर करण्यात आला असून, त्यावर मा.मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर तो शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, असे वित्त विभागाने कळविले होते. त्यामुळे दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा संलग्न वसतिगृहे अधीक्षक/गृहपाल श्रेणीत सुधारणा करण्याबाबतचा आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेला अहवाल प्रतिक्षाधीन ठेवण्यात आला होता.

आता राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील वेतन श्रेण्यांविषयक व आनुषंगिक शिफारशी स्वीकृत करण्याबाबतचा वित्त विभागाने शासन निर्णय दिनांक १३/०२/२०२३ रोजी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे. परंतु सदरहू शासन निर्णयामध्ये दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा संलग्न वसतिगृहे अधीक्षक/गृहपाल श्रेणीत सुधारणा करण्याबाबतचा समावेश केलेला नाही.

(४) हे खरे आहे.

विदर्भ दिव्यांग शाळा कर्मशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघ, नागपूर यांचे विविध मागण्यांसंदर्भातील दिनांक १८/१२/२०२२ रोजीचे निवेदन आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांना सादर केले आहे.

(५) शासन निर्णय दिनांक ०८/०४/२०१५ मधील दिव्यांगांच्या १२३ शाळा व कर्मशाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ५० टक्के वरुन १०० टक्के वेतन देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात येत आहे.

राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळांमधील कार्यारत असणाऱ्या शारीरिक शिक्षक व निदेशक यांना पदवीधर बी.एड. समकक्ष बी.पी.एड. वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला असता, वित्त विभागाने राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ च्या विचारार्थ सादर प्रस्ताव सादर केला होता.परंतु, समितीचा अंतिम अहवाल खंड-२ प्राप्त झाल्यानंतर त्यामधील शिफारशींनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे अभिप्राय दिले होते.

आता राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील वेतन श्रेण्यांविषयक व आनुषंगिक शिफारशी स्वीकृत करण्याबाबतचा वित्त विभागाने शासन निर्णय दिनांक १३/०२/२०२३ रोजी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला असून सदरहू शासन निर्णयामध्ये उक्त पदाचा समावेश केलेला नाही.

राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे निधी आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांना वितरित करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन विनाविलंब करण्याबाबत सर्व जिल्हास्तरीय आहरण व संवितरण अधिकारी यांना दक्षता घेण्याबाबतच्या सूचना आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिलेल्या आहेत. त्याशिवाय सचिव (दि.क.) यांच्या निर्देशानुसार दिनांक २४/०२/२०२३ रोजी उपायुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदरहू बैठकीस शासनातर्फे अवर सचिव (दि.क.) हे उपस्थीत होते. उक्त बैठकीमध्ये सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना बिम्स प्रणालीवर निधीची उपलब्धता दाखवून तो निधी तात्काळ खर्च करुन गरज पडल्यास मागणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रात क्लस्टर प्रकल्पातील जुन्या अधिकृत इमारतींना स्वतंत्रपणे विकसित करण्यासाठी परवानगी देण्याबाबत

**(१२)** * **१७५४२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेची स्थापना होण्यापूर्वी ठाणे नगरपरिषदेच्या क्षेत्रात आजूबाजूंची गावे-ग्रामपंचायतींचा समावेश करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे नगरपरिषदेच्या कार्यकाळापासून नौपाडा, ब्राम्हण सोसायटी, विष्णू नगर, बी-केबिन, घंटाळी इ. परिसरात नियमानुसार सर्व आवश्यक परवानगी घेऊन इमारती उभ्या राहिल्या व सदर इमारतीतील रहिवाशांकडून वर्षानुवर्षे नियमित कर भरणा करण्यात येत होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या ३५-४० वर्ष पूर्ण झालेल्या सदरहू इमारती पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असून ठाणे महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या क्लस्टर प्रकल्पात जुन्या अधिकृत इमारतींचा समावेश करण्याची सक्ती करण्याच्या निर्णयासंदर्भात पुनर्विचार करुन, सदर इमारतींना स्वतंत्रपणे विकसित

करण्यासाठी परवानगी देण्याचे धोरण निश्चित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या क्लस्टर प्रकल्पात जुन्या अधिकृत इमारतींना स्वतंत्रपणे विकसित करण्यासाठी परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) शासनाने दिनांक २८/१२/२०२२ रोजी एकत्रिकृत विकास नियत्रंण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये फेरबदल मंजूर केलेला आहे, त्यामध्ये विनियम क्र.१४/०८/५(v) ही नवीन तरतूद समाविष्ट केली आहे. त्या मध्ये नागरी पुनरुत्थान योजनेत अधिकृत/अनधिकृत/बेकायदेशीर इमारती आणि झोपडपट्टी यामधील पात्र लाभार्थी पैकी जे योजनेत स्वेच्छेने सहभागी होणार नाहीत त्यांच्या बाबत करावयाच्या कार्यवाहीची तरतूद अंतर्भूत करण्यात आलेली होती. तथापि, शासनाने दिनांक ११/०१/२०२३ रोजीच्या शुध्दीपत्रकाद्वारे सदर तरतूदीमधुन अधिकृत (Authorized) इमारतींचा उल्लेख वगळण्यात आलेला आहे. त्यामुळे अधिकृत इमारतीमधील भोगवटाधारकांवर क्लस्टर योजनेत समाविष्ट करणेबाबत सक्ती असण्याचा प्रश्न राहिलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील गावांमध्ये सिडकोकडून होणारी भूसंपादनाची प्रक्रिया रद्द करण्याबाबत

**(१३) * १६९२८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चाणजे, रानवड, नागाव, बोकडविरा, पागोटे, फुंडे व नवघर (ता.उरण, जि.रायगड) या ७ गावांतील सुमारे ३६६ हेक्टर जमीन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये भूसंपादन करण्याबाबतची अधिसूचना अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रा.ठा.) सिडको/जनसंपर्क/२७७/२०२२-२०२३ यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्रसिध्द केली आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २० मार्च, १९७१ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात उपरोक्त गावांच्या जमिनींचा उल्लेख हरितपट्टा (ग्रीन झोन) म्हणून सिडकोने आरक्षित केला असून सन १९७१ ते १९८८ पर्यंत सदरच्या जमिनी संपादित न केल्यामुळे ती अधिसूचना व्यपगत होवून सन २०१८ मध्ये सिडकोने विकास आराखड्यात रिजनल पार्क आरक्षण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन विकास आराखड्यात सन २०१८ मध्ये रिजनल करीता असलेले आरक्षण काढले असूनही सदर जमिनीवर विकासकामे करण्याकरीता नगरविकास प्राधिकरणाने मंजूरी दिलेली नसून, दरम्यानच्या काळात सन १९८८ मध्ये भूसंपादनाची सूचना व्यपगत झाल्यानंतर अनेक शेतकरी व जमीनमालक यांच्या कुटुंबाचा विस्तार झाल्याने स्वत:साठी कुटुंबाच्या सोयीकरीता घरे बांधलेली असून जमिनीचा वापर फक्त कौटुंबिक घरे बांधण्याकरीता होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिडकोने भूसंपादनासाठी काढलेल्या नोटिशीमुळे आयुष्यभराची जमापुंजी वापरुन बांधलेली सुसज्ज घरे जमीनदोस्त करावी लागणार असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये भूसंपादन करण्याबाबतची जाहीर केलेली सूचना रद्द करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू भूसंपादनाची प्रक्रिया रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) शासनाच्या दिनांक २०/०३/१९७१ व दिनांक १६/०८/१९७३ च्या अधिसूचनांनुसार ठाणे व रायगड जिल्ह्यातील एकूण ९५ गावांतील जमिनी नवी मुंबई प्रकल्पाकरीता अधिसूचित झाल्या असून सदर अधिसूचीत क्षेत्रासाठी सिडको महामंडळाची "नवनगरविकास प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर जमिनी ह्या सार्वजनिक प्रयोजनासाठी विहित असून प्रकल्पाची व्याप्ती विचारात घेऊन विकास कामांच्या आवश्यकतेनुसर सदर अधिसूचीत जमिनींचे टप्याटप्याने संपादन करण्यात येत आहे.

मौजे चाणजे, रानवड, नागाव, बोकडविरा, पागोटे, फुंडे व नवघर ह्या ७ गावांतील गावठाण क्षेत्र वगळून इतर जमिनी उक्त दिनांक २०/०३/१९७१ च्या अधिसूचनेद्वारे नवी मुंबई प्रकल्पासाठी अधिसूचित आहेत. सदर अधिसूचनेमध्ये उपरोक्त गावांचा हरीत पट्टा (Green Zone) असा उल्लेख असल्याचे दिसून येत नाही. तद्नंतर नवी मुंबई प्रकल्पांतर्गत समाविष्ठ क्षेत्रातील जमिनींवर सिडकोने तयार केलेला विकास आराखडा सन १९८० पासून अंमलात आला असून सदरचे क्षेत्र नवी मुंबई विकास आराखड्यानुसार विविध वापर विभागात (Zone) म्हणजेच प्रादेशिक उद्यान क्षेत्र (Regional Park Zone) रहिवासी क्षेत्र, विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) व औद्योगिक क्षेत्रात येते. सदर विकास योजनेमध्ये सन २०१६ व २०१८ मध्ये सिडकोकडून कोणताही वापर बदल करण्यात आलेला नाही.

उपरोक्त ७ गावांतील जमिनींसाठी सिडको हे नवनगरविकास प्राधिकरण तथा नियोजन प्राधिकरण आहे. सदर गावांतील अधिसूचीत तथापि, असंपादित जमिनीवर नियोजन प्राधिकारी यांच्या परवानगीशिवाय भूधारकांनी घरे बांधल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) व (५) मौजे चाणजे, रानवड, नागाव, बोकडविरा, पागोटे, फुंडे व नवघर (ता.उरण, जि.रायगड) या ७ गावांतील अधिसूचीत तथा असंपादित जमिनीच्या संपादनाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ अन्वये दिनांक १२/१०/२०२२ रोजी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती व सूचना यांची तपासणी करुन संमती निवाड्याद्वारे जमिनीच्या संपादनाची कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०” या अभियानाद्वारे शहरे स्वच्छ, सुंदर व कचरामुक्त ठेवण्याबाबत

**(१४) * १७५७४ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविण्यास शासनाने सन २०१४-२०१५ मध्ये सुरुवात केली असून राज्यात दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजीपासून “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०” सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियानांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून इतर महानगरपालिका, नगरपालिका, एक लाख लोकसंख्येची ग्रामीण शहरे, नगरपरिषदा, नगरपंचायती यासंबंधीचे घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन करणे, शहराचा विकास आराखडा तयार करणे, शहर स्वच्छ व सुंदर आणि कचरामुक्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट असून त्याची अंमलबजावणी करणे ही प्रमुख कामे या अभियानामार्फत केली जात असून त्यास राज्य व केंद्र शासनामार्फत अर्थसहाय्य देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभियानाची सुरुवात करण्यापूर्वी दिनांक १८ जुलै, २०२२ ते दिनांक १२ डिसेंबर, २०२२ पर्यंतच्या सहा महिन्याचे कालावधीत नगरविकास विभागाने तीन संचालकाच्या बदल्या केल्यामुळे अभियानाच्या अंमलबजावणीत अडचणी निर्माण होऊन याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०” अभियानाद्वारे शहरे स्वच्छ व सुंदर आणि कचरामुक्त ठेवण्याबाबत तसेच पुढील काळात सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याबाबतचे अभियान यशस्वी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० च्या धर्तीवर राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० ची अंमलबजावणी दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी सुरू करण्यात आली आहे.

(२) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शाश्वत घन कचरा व्यवस्थापन, शाश्वत स्वच्छता आणि वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया या घटकांकरीता केंद्र, राज्य व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी उपलब्ध होणार आहे. तसेच १ लक्षपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरात भूमीगत गटाराचे जाळे (Sewage Network) उभारणे व नवस्थापित नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या घनकचरा संकलन व वाहतूक या बाबींकरीता राज्य व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत निधी उपलब्ध होणार आहे.

(३) व (४) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० ची अंमलबजावणी राज्यस्तरावर मिशन मोड पध्दतीने सुरू आहे.

सदर अभियानातंर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा शहर घनकचरा व्यवस्थापन कृती आराखडा आणि स्वच्छता व सांडपाणी आणि सेप्टेज व्यवस्थापनासाठी शहर स्वच्छता कृती आराखडा असा एकूण रूपये १२,४०९.३१ कोटी किंमतीचा आराखडा केंद्र शासनाकडून मंजूर करून घेण्यात आला आहे.

सदर अभियानाकरीता आतापर्यंत केंद्र व राज्य शासनाचा एकूण ३०७.०७२६ कोटी इतका निधी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्यात आला आहे.

स्वच्छ भारत अभियान-२.० अभियानांतर्गत सर्व मंजूर प्रकल्पांसाठी घनकचरा व्यवस्थापन आणि मलनि:स्सारण संबंधित मंजूर झालेल्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यासाठी दिनांक १४/२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये संस्थांचे विभागनिहाय नामिकासूची (empanelment) तयार करण्यात आले आहेत. तसेच सदर सर्व प्रकल्प विहित कालमर्यादेत व प्रकल्पांची कामे सक्षमपणे अंमलबजावणी करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिनांक १४/२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर मेट्रो मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्रीय वेतन आयोगाच्या वेतन पध्दती पासून वंचित ठेवल्याबाबत

**(१५)** * **१७४०० श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मेट्रोमध्ये सफाई कर्मचारी, सुरक्षारक्षक तथा अन्य तत्सम पदांवर अंदाजे ११०० कर्मचारी कार्यरत असून उपरोक्त कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या वेतन आयोगानुसार वेतन अदा केले जात नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कर्मचाऱ्यांना पूर्व कल्पना न देता तसेच मार्च २०२२ च्या केंद्रीय कामगार आयुक्तांच्या निर्णयाची अंमलबजावणी न करता राज्य शासनाच्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन नियमांचे उल्लंघन करुन वेतन अदा करण्यात येत असल्यामुळे कामगारांवर अन्याय होत असल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी तक्रारी, निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामगारांना केंद्राच्या वेतन धोरणानुसार वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) किमान वेतन काय़दा १९४८ च्या कलम २(ब) नुसार महामेट्रो समुचित शासन (Appropriate Government) राज्य सरकार असल्याने तसेच महामेट्रोच्या संचालन व देखरेख तसेच कर्ज परत फेडीचा आर्थिक भाग राज्य शासनास उचलायचा असल्याने नागपूर मेट्रो मध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या किमान वेतनाऐवजी राज्य शासनाच्या किमान वेतन अदा करण्यात येते.

तथापि, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वतीने कामगार प्रवर्तन अधिकारी यांनी विभागीय कामगार आयुक्त (केंद्रीय) यांचेकडे दावा दाखल केला असून विभागीय कामगार आयुक्त (केंद्रीय) यांनी केंद्र सरकारच्या अधिसूचित दराप्रमाणे नुसार वेतन देण्याबाबत दिनांक २२/०२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये निर्देश देण्यात आले आहे.

यानुषंगाने महा-मेट्रोने केंद्रीय विभागीय आयुक्त यांच्या दिनांक २२/०२/२०२२ चे आदेशाचे पुनर्विलोकन करण्याची विनंती दिनांक १७/०३/२०२२ रोजी केंद्रीय विभागीय आयुक्त यांचेकडे केली होती. सदर अर्ज दिनांक २१/१०/२०२२ रोजी अर्ज नाकारण्यात आला आहे.

तथापि, महा-मेट्रोद्वारे केंद्रीय विभागीय कामगार आयुक्त यांचे दिनांक २२/०२/२०२२ व २१/१०/२०२२ रोजीच्या आदेशाविरुध्द दिनांक २२/११/२०२२ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका क्र. WP/७५५६/२०२२ दाखल करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## राज्यातील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याबाबत

**(१६) * १७६१९ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५८५३ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ४४५ वसतिगृहांतील ५० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता माहे फेब्रुवारी, २०२२ पासून देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागात ५० पैशाच्या आत पैसेवारी जाहीर झालेल्या गावांना दुष्काळाच्या सवलती देण्याबाबत

**(१७) * १७८०६ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागीय आयुक्तांनी पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यातील ७ हजार २०८ गावांमध्ये सरासरी ४७ पैसेवारी जाहीर करुन या गावांच्या मदतीसाठीचा अहवाल शासनाकडे पाठविला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अमरावती विभागात ५० पैशाच्या आत पैसेवारी जाहीर झालेल्या गावांना दुष्काळाच्या सवलती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) राज्यात आता अंतिम पैसेवारीच्या आधारे दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही केली जात नाही. तर दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ नुसार जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करून विहीत केलेल्या निकषानुसार, दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही केली जाते आणि दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यांकरीता सवलती दिल्या जातात. सदर निकषानुसार अमरावती विभागात कोणत्याही तालुक्यात दुष्काळ घोषित करण्यात आलेला नसल्यामुळे सवलती व सुविधा जाहीर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीतील खरीप हंगामामध्ये अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी अमरावती विभागाकरीता रुपये १९४४०३.३८ लक्ष इतके निविष्ठा अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील उड्डाण पुलांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत

**(१८) * १७६११ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे मुंबईतील ५५ उड्डाणपुलांचे (फ्लाय ओव्हर ब्रिज) हस्तांतरण माहे डिसेंबर, २०२१ मध्ये करण्यात आले असून महानगरपालिकेने पुलांची देखभाल व दुरुस्ती केली नसल्याने सदरहू ५५ उड्डाणपुलांचे (फ्लाय ओव्हरचे) आयुष्यमान तपासण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उड्डाणपुलांच्या बांधकामासाठी वापरलेले साहित्य, भार वाहण्याची क्षमता, लोड टेस्टबाबतचा तपशिल, देखभाल व दुरुस्तीचा तपशील एम.एम.आर.डी.ए. कडे मागितला असूनही त्याचा तपशिल अद्याप देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेतील उड्डाण पुलांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्ग “अस्तित्वातील स्थितीत” या तत्वावर दिनांक २९/११/२०२२ रोजी हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

यामध्ये मुंबई महानगर प्राधिकरणाचे पूल समाविष्ट असून, पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गावर बांधलेल्या प्रत्येक पुलाच्या संपूर्ण तपशीलाच्या मागणीसाठी पत्रव्यवहार सुरु आहे. तसेच उर्वरित पूल हे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अखत्यारीत असून, सद्य:स्थितीत सदर पुलांचे हस्तांतरण बृहन्मुंबई महानगरपालिकेस झालेले नाही. सदर पुलांची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फत करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गावरील पुलांचा संपूर्ण तपशील प्राप्त झाल्यानंतर, आय.आय.टी. मुंबई / व्ही.जे.टी.आय./ एस.पी.सी. यातील कोणत्याही एका संस्थेमार्फत संरचनात्मक परीक्षण करुन देखभाल व दुरुस्तीची कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दैठणा (ता.जि.परभणी) येथील वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(१९) * १७२०९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दैठणा (ता.जि.परभणी) येथील गट क्र.५५६ मधील कब्रस्तान व बुरानोदीन शहा दर्गा या नावाची नोंद सन १९७४ च्या राजपत्रात असतानाही तलाठी, मंडळ अधिकारी व तहसिलदार यांनी याबाबतची नोंद ७/१२ वर घेतली नसल्यामुळे मुस्लिम समाजाच्या दफन विधी व धार्मिक कार्यात अडथळा येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गट क्र.५५६ मधील कब्रस्तान किंवा दर्गा ची ७/१२ नोंद वर घेवून न्याय देण्याची मागणी मुस्लिम समाजाने सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गट क्रमांकात कब्रस्तान व दर्गा ची ७/१२ वर नोंद होत नसल्यामुळे सदरहू जागेत अतिक्रमण होत असून याप्रकरणी शासनाने लक्ष देण्याची मागणी उपरोक्त निवेदनात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सन १९७४ च्या राजपत्रातील नोंदीनुसार गट क्रमांक ५५६ मधील कब्रस्तान किंवा दर्गा ची ७/१२ वर नोंद घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. सन १९७४ सालीच्या राजपत्रामध्ये दैठणा, ता.जि.परभणी येथील दर्गाह बुरहानुद्दीन साहब व कब्रस्थान या वक्फ संस्थेचा उल्लेख करण्यात आलेला असून त्याची मालमत्ता ३७५ x १३५ फूट इतकी दाखविण्यात आलेली आहे. तथापि, त्यामध्ये मालमत्तेचा सर्वे क्रमांक अथवा गट क्रमांक दर्शविण्यात आलेला नाही.

(२) आणि (३) होय, हे खरे आहे.

(४) वक्फ मालमत्तांच्या मालमत्तांपत्रकांवर (७/१२ उताऱ्यावर) भोगवटादार सदरी फक्त संबंधित वक्फ संस्थेच्या नावांची नोंद असावी व त्याशिवाय अन्य कोणाच्या नावाच्या नोंदी असू नयेत, त्याचप्रमाणे वक्फ मालमत्तांच्या इतर हक्काच्या रकान्यात देखील केवळ "प्रतिबंधित सत्ता प्रकार" अशी नोंद घेण्याबाबत दिनांक १३/०४/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत महसूली प्राधिकरणांना वेळोवेळी शासन स्तरावरुन निदेश देण्यात आलेले आहेत.

दर्गाह बुरहानुद्दीन साहब व कब्रस्तान या वक्फ संस्थेची मालमत्ता नेमकी कोणत्या गट क्रमांकामध्ये येते याचा उल्लेख शासन राजपत्रात नसल्याने मालमत्तेची मोजणी करुन घेण्याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून कार्यवाही सुरु आहे तसेच जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर जागेची मोजणी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खरबी (जि.हिंगोली) येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२०) * १७७५८ डॉ.प्रज्ञा सातव : दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १६ मधील प्रश्न क्रमांक १३४५८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील रुपये २८ कोटींची मंजुरी असलेल्या खरबी, हिंगोली, दुर्गधामणी, समगा व टाकळगव्हाण या कामांना जलसंधारण महामंडळांतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त असून कार्यारंभ आदेश दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी निर्गमित झाल्यानंतर हिंगोली, दुर्गधामणी, समगा व टाकळगव्हाण बांधकामे जोता पातळी पर्यंत कामे पूर्ण करण्यात आली, त्यापैकी खरबी येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खरबी येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

हिंगोली जिल्ह्यातील खरबी, हिंगोली, दुर्गधामणी, समगा व टाकळगव्हाण या १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या ०५ को.प. बंधारे कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त असून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

वरील ५ कामांपैकी हिंगोली, दुर्गधामणी, टाकळगव्हाण या ३ को.प. बंधाऱ्यांची कामे जोता पातळीपर्यंत पूर्ण करण्यात आली असून हिंगोली को.प.बं. चे स्तंभ (pier) बांधकाम प्रगतीपथावर आहे. समगा को.प.बं. चे पाया खोदकाम प्रगतीत आहे. या ४ योजनांची सर्व कामे माहे जून, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मौ.खरबी कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले असून को.प. बंधाऱ्यात सन २०२२ च्या हंगामात अंशत: पाणीसाठी निर्माण करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## सातेफळ (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) गावात नियमित बस सेवा सुरु ठेवण्याबाबत

**(२१) * १७६८८ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातेफळ (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) गावातील विद्यार्थ्यांनी राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसचा प्रवासी पास काढूनही सातेफळ गावात नियमित बसेस येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी चांदूर आगारातील बसेस अडवून ठेवल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातेफळ गावात नियमित बसेस येत नसल्यामुळे शालेय विद्यार्थीचे शैक्षणिक नुकसान होत असून दैनंदिन प्रवाशांची देखील गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सातेफळ गावात नियमित बस सेवा सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) सातेफळ गावाकरीता फेऱ्या नियमित सुरु आहेत.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२२) * १६९३७ श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक १६३३९ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी मागण्यांची पूर्तता करण्यासाठी दिनांक २९ ऑक्टोबर, २०२१ पासून सहा महिन्यांच्या कालावधीत मुंबईतील आझाद मैदानावर केलेल्या संपाच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांच्या एकूण १८ मागण्यांपैकी १६ मागण्या मान्य करण्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आश्वासन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू १६ मागण्यांपैकी अनेक मागण्यांची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सेवा संघर्ष समिती राज्य मार्ग परिवहन महामंडळ कर्मचारी संघाने दिनांक २० डिसेंबर, २०२२ पासून नागपूर येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा शासनाला दिला असूनही सदरहू मागण्यांची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) सेवा शक्ती संघर्ष एस.टी.कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य यांनी १६ मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी आमरण उपोषण केले होते.

मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या दालनामध्ये सेवा शक्ती संघर्ष एस.टी.कर्मचारी संघ यांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करुन प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत आश्वासीत केल्याने आमरण उपोषण स्थगित करण्यात आले.

-----------------

## कोल्हापूर येथील पंचगंगा नदीत प्रदूषित सांडपाणी सोडणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२३)** * **१७४०९ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीमध्ये रासायनिक प्रदूषित सांडपाणी सोडल्यामुळे हजारो मासे मृत्यू पावल्याची घटना दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचगंगा नदीत रासायनिक प्रदूषित सांडपाणी सोडणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पंचगंगा नदीपात्रात प्रदूषित सांडपाणी सोडणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रश्नाधीन विषयाबाबतचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.
(२) हे खरे आहे.
(३) • महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीदरम्यान सुर्वे बंधारा वळीवडे येथे मोठ्या प्रमाणात मासे मृत झाल्याचे आढळून आले होते. तसेच नदी पात्रातील पाणी हिरवट रंगाचे होऊन तेथे उग्र वास येत असल्याचे निदर्शनास आले होते. तसेच सुर्वे बंधाऱ्याच्या वरील बाजूस अंदाजे १ ते १.५ कि.मी. वर वळीवडे व गांधीनगर भागातील घरगुती सांडपाणी पंचगंगा नदी पात्रात मिसळत असल्याचे आढळून आले होते.

• पाहणीदरम्यान दोषी आढळून आलेल्या पाणीपुरवठा अभियंता (Hydrolic Engineer), कोल्हापूर महानगरपालिका व पर्यावरण अभियंता, मे.कोल्हापूर शुगर मिल, मे.राजाराम सहकारी साखर कारखाना, यांना दिनांक ०६/०१/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीसा व मे.राजाराम सहकारी साखर कारखाना यांना दिनांक २५/०१/२०२३ रोजी प्रस्तावित आदेश बजावण्यात आलेले आहेत.

- तसेच ग्रामपंचायत, वळीवडे व गांधीनगर यांना दिनांक २३/०१/२०२३ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. तसेच इचलकरंजी महानगरपालिकेला दिनांक १९/०१/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस व दिनांक ३०/०१/२०२३ रोजी कोल्हापूर महानगरपालिकेला प्रस्तावित आदेश बजावण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई मॅफ्को मार्केट परिसरातील अतिक्रमणे हटविण्याबाबत

**(२४) * १७८७८ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील मॅफ्को मार्केटच्या परिसरातील मोकळ्या जागेत कोल्ड स्टोरेज, दूध डेअरी व इतर व्यावसायिकांनी अतिक्रमण केले असून व्यावसायिकांनी अग्निशमन व इतर सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करुन सदरहू मोकळ्या जागेत शेड व इतर बांधकामे उभारुन व्यावसायिक वापर सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई मॅफ्को मार्केट परिसरातील अतिक्रमणधारकांवर कारवाई करुन सदरहू अतिक्रमणे हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे

- नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील तुर्भे, सेक्टर १८ या ठिकाणी गोकुळ डेअरी, वारणा डेअरी, इग्लू डेअरी, कृष्णा डेअरी इ. दुग्ध उत्पादक व्यावसायिक, कोल्ड स्टोरेज धारक तसेच, इतर व्यावसायिक असे एकूण १५ ते २० व्यावसायिक व्यवसाय करीत असून, त्यापैकी काही व्यावसायिकांनी अनधिकृत शेड/बांधकामे केल्याबाबत, सन २०१६ व २०१८ मध्ये तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या होत्या.

(२) होय, हे खरे आहे.

- नवी मुंबईतील मॅफ्को परिसरातील ०७ अनधिकृत बांधकामधारकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये नोटीस देणे व अतिक्रमण हटविणे याबाबत कारवाई करण्यात आलेली आहे.
- यापैकी १ प्रकरणी अनधिकृत शेड धारकाला नोटीस बजावल्यानंतर नोटीसधारक यांनी, महानगरपालिकेविरूध्द मा.वाशी न्यायालय येथे दावा क्र. १५४/२०१९ दाखल केला असून, सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाकण, पाली, खोपोली (जि.रायगड) येथील अंबा नदीवरील पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(२५) * १७९६० श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकण, पाली, खोपोली (जि.रायगड) या राज्य महामार्गावरील पाली गावालगत असणाऱ्या अंबा नदीवरील पुलाचे संरक्षण कठडे तुटल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे कठडे म्हणून प्लास्टीक पट्टी लावण्यात आली असल्याने परिणामी अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वी अंबा नदीपुलावरुन झायलो गाडी नदीपात्रात कोसळून वृध्द महिलेला प्राण गमवावे लागले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या मोडकळीस आलेल्या पुलाची पुर्नबांधणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) सदरचे काम सुरु केल्यापासून अशा घटनेची नोंद नाही.
(४) पाली येथील अंबा नदीवरील जुन्या जीर्ण पुलाचे पुनर्बांधणीचे काम प्रगतीत आहे. संरक्षक कठडे हे Steel Barricades चे असून त्याची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत कोविड काळात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२६) * १८०९७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मे.ओम साई आरोग्य केअर प्रा.लि., मे.मॅजिकडील हेल्थ फॉर ऑल कंपनी व डॉ.अमित गर्ग यांना माहे जुलै ते सप्टेंबर, २०२० व माहे फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत कोविड सेंटर चालविण्यास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तीन कंपन्यापैकी मे.मॅजिकडील हेल्थ फॉर ऑल कंपनी व डॉ.अमित गर्ग यांना कोविड सेंटर चालविण्यासाठी मे.ओम साई आरोग्य केअर प्रा.लि या कंपनी पेक्षा ३०० टक्क्यांनी जास्तीचे दर दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेने कोविड सेंटर चालविण्यासाठी मे.मॅजिकडील हेल्थ फॉर ऑल कंपनी व डॉ.अमित गर्ग यांना जास्तीचे दर देण्याचे कारण काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने दोषी आढळून आलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच पुरवठादारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

- मे.मॅजिकडील हेल्थ फॉर ऑल, ओम साई आरोग्य केअर व डॉ. अमित गर्ग या तीन कंपन्यांना कोविड सेंटर चालविण्यासाठी पुढीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आलेले होते.

| रूग्णालयाचे नाव | कंपनी | आय.सी.यू. चे दर | ऑक्सिजन बेडचे दर |
|---|---|---|---|
| सावळाराम महाराज क्रीडा संकुल | मे. मॅजिकडील हेल्थ फॉर ऑल | ४७५० | ७९० |
| पाटीदार भवन | मे. मॅजिकडील हेल्थ फॉर ऑल | ४७५० | ९०० |
| डोंबिवली जिमखाना | ओम साई आरोग्य केअर | १४९९ | ७४९ |
| वसंत व्हॅली | ओम साई आरोग्य केअर | १४९९ | ७४९ |
| आसरा फाऊडेशन स्कूल | ओम साई आरोग्य केअर | १४९९ | ७४९ |
| आर्ट गॅलरी | डॉ. अमित गर्ग | ४१४० | ७७४ |
| रूक्मिणी प्लाझा | मे. मॅजिकडील हेल्थ फॉर ऑल | ४१४० | ७७४ |

- ओम साई आरोग्य केअर यांचे आय.सी.यू. चे दर कमी दिसत असले तरी त्यांना या दराव्यतिरिक्त मनुष्यबळाचे वेतन, डॉक्टर्ससाठी हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था व कार्यरत कर्मचारी यांचे जेवण या सुविधा देण्यात येत होत्या.
- त्याशिवाय ओम साई आरोग्य केअर संचलित रूग्णालयातील हाऊसकिपिंग सुविधा महानगरपालिकेमार्फत वेगळी पुरविण्यात येत होती.
- मे. मॅजिकडील हेल्थ फॉर ऑल, यांना सावळाराम क्रीडा संकुल व पाटीदार भवन ही दोन कोविड सेंटर चालविण्यासाठी निविदेद्वारे न्यूनतम दर असल्याने मार्च, २०२१ मध्ये कार्यादेश देण्यात आले होते.
- डॉ.अमित गर्ग, यांना आर्ट गॅलरी कोविड रूग्णालय चालविण्यासाठी माहे सप्टेंबर, २०२० मध्ये निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम दर प्राप्त झाल्याने, त्यांना फेब्रुवारी, २०२१ मध्ये कार्यादेश देण्यात आले होते.
- ओम साई आरोग्य केअर यांना डोंबिवली जिमखाना, वसंत व्हॅली व आसरा फाऊंडेशन स्कुल ही तीन रूग्णालये चालविण्यासाठी कार्यादेश देण्यात आलेले होते.
- ओम साई आरोग्य केअर या संस्थेस अन्य महानगरपालिकेतील त्यांच्या दराच्या आधारे महानगरपालिका अधिनियम, ६७(३)(क) अन्वये ऑगस्ट, २०२० मध्ये कार्यादेश देण्यात आले होते.
- सदर संस्थेने या दरामध्ये रूग्णालय चालविणे परवडत नसल्याचे, पत्र माहे मे, २०२१ मध्ये महानगरपालिकेस सादर केले होते. त्यानुसार सदर संस्थेला आय.सी.यू. करीता रुपये ३९९९/- तर ऑक्सिजनकरीता रुपये ७७४/- याप्रमाणे दर वाढवून देण्यात आलेले आहेत.
- त्यामुळे ओम आरोग्य केअर प्रा. लि. यांनी अन्य कंपन्यापेक्षा कमी दराने काम केलेले नाही, असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) • मे.ओम साई आरोग्य केअर यांना माहे मे, २०२१ पासून सुधारित दर लागू करण्यात आले होते. तसेच, तीनही संस्थांना जवळपास सारख्याच दराने कार्यादेश देण्यात आला होता.त्यामुळे कोविड या प्रकरणी गैरव्यवहार झाला नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही, असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खेरनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील शाळा संकुलात विद्यार्थ्यांना बसण्याकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७)** * **१८१५६ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खेरनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील महानगरपालिका शाळा संकुलातील २ इमारतींपैकी एक इमारत पाडण्यासाठी रिकामी केली असून त्याचवेळी दुसऱ्या इमारतीचीही दुरुस्ती करण्यात येत असल्यामुळे ३ हजार विद्यार्थी शाळा बाह्य झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेरनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीचे दुरुस्त झालेले मजले कंत्राटदारामुळे महानगरपालिका शिक्षण प्रशासनाने खाजगी संस्थेस दिल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या संकुलात बसण्यास जागा नसल्याची तक्रार शिक्षकांनी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीचा एक मजला कोणताही करार नसताना खाजगी संस्थेस दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खेरनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील महानगरपालिका शाळा संकुलातील जागा खाजगी संस्थेस देणाऱ्यांवर कारवाई करुन महानगरपालिका शाळा संकुलात विद्यार्थ्यांना बसण्याकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खेरनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील महानगरपालिका शाळा संकुलातील दोन इमारतींपैकी तळमजला + दोन मजल्यांची एक इमारत धोकादायक अवस्थेत असल्यामुळे पुनर्बांधणी करण्यासाठी व तळमजला + चार मजल्यांची दुसरी इमारत दुरुस्तीकरीता रिकामी करण्यात आली, ही वस्तुस्थिती आहे.

त्यादरम्यान सदर दोन्ही शाळा इमारतीतील एकूण ४९६० विद्यार्थ्यांना एच/पूर्व विभागाच्या हद्दीतील खेरवाडी, शिवाजी नगर, निर्मल नगर, नारीयल वाडी या मनपा शाळांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्यात आले.

सद्य:स्थितीत दुरुस्तीकरीता रिकामी करण्यात आलेल्या शाळा इमारतीच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून, स्थलांतरीत करण्यात आलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ९१९ विद्यार्थ्यांना सदर इमारतीत पुनर्स्थापित करण्यात आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली होती, हे खरे आहे.

धोकादायक अवस्थेतील शाळा इमारतीमधील ६ वर्गखोल्या कॅंसर एज्युकेशन सोसायटी या खाजगी संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयास सन २००८ च्या पूर्वीपासून अनुज्ञा व अनुज्ञापन वार्षिक भाडे तत्वावर करार करुन देण्यात आल्या आहेत. सदर कराराचे नुतनीकरण प्रत्येक वर्षाला करण्यात येते.

सदर शाळा इमारत पुनर्बांधणीसाठी रिकामी करण्यात आल्यानंतर, सदर कनिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता कँसर एज्युकेशन सोसायटी या संस्थेने केलेल्या विनंतीस अनुसरुन, सदर विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था दुरुस्तीचे काम पूर्ण झालेल्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील सहा वर्गखोल्यांमध्ये करण्यात आली आहे. तसेच इतर वर्गखोल्यांमध्ये मनपा शाळेतील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

धोकादायक अवस्थेतील शाळेची इमारत पुनर्बांधणीनंतर तळमजला + ६ मजले अशी प्रस्तावित असून, इमारत पूर्ण झाल्यानंतर स्थलांतरीत करण्यात आलेल्या उर्वरित विद्यार्थ्यांना सदर इमारतीत पुनर्स्थापित करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थाने (बार्टी) परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता एकाच संस्थेस बेकायदेशीर कंत्राट दिल्याबाबत

**(२८) * १८१९५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या आयबीपीएस, रेल्वे, एलआयसी, बँक इ. परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता एकाच संस्थेस बोगस कागदपत्रांचे आधारावर बेकायदेशीर कंत्राट देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या संस्थेमार्फत अनुसूचित जातीच्या युवक व युवतींसाठी बँक आयबीपीएस, रेल्वे व एल.आय.सी. व तत्सम स्पर्धा परिक्षांच्या पूर्व तयारीकरीता १६ जिल्ह्यामधून ई-निविदा प्रक्रिया राबविण्याकरीता बार्टीमार्फत १ वर्षाकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ई-निविदेतील पात्र संस्थांना कार्यारंभ आदेश देण्यात आले होते.

पुर्णा बहुउद्देशीय संस्था, अमरावती, व्दारका बाई रामराव कुटे बहुउद्देशीय संस्था, अकोला व स्कायकीपर एज्युकेशन वेल्फेअर ॲड मल्टीपर्पज सोसायटी, बुलढाणा या भिन्न संस्था असून यांचे संस्थाचालक वेगवेगळे आहेत. उपरोक्त तीन संस्थेच्या अनुषंगाने काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने बार्टीने चौकशी केली असता, अमरावती, बुलढाणा व अकोला येथील संस्थांनी एकाच तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन ऑनलाईन स्वरूपात मिळण्याकरीता करार केल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु, सदर बाब या तीनही संस्थांनी निविदा भरताना नमूद केलेली नाही. तसेच, निविदेच्या अटी व शर्ती मध्ये प्रशिक्षण संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था अधिनियम नुसार पंजीबध्द/प्रायव्हेट लिमिटेड कंपनी किंवा प्रोप्रायटर फर्म नोंदणीकृत (संयुक्त भागीदारी नसलेल्या कंपनी/ प्रोप्रायटर फर्म) असलेले नोंदणी प्रमाणपत्र व कागदपत्रे असणाऱ्या संस्थांची निवड करण्यात येणार असल्याचे प्रसिध्द आहे. या संस्थांनी नोंदणीकृत करार केला असल्याचे नमूद आहे. त्यामुळे प्रसिध्द

करण्यात आलेल्या निविदेच्या अटी व शर्तीचा भंग केला असल्याचे आढळून आल्याचे नमूद करून बार्टीने अमरावती, बुलढाणा व अकोला येथील दिलेले कार्यारंभ आदेश दिनांक २७/०१/२०२३ अन्वये रद्द केले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये कंत्राटी तत्वावरील लसटोचकांना सहायक आरोग्य सेविका पदावर कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत

**(२९) * १७०२४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये लसीकरणासाठी लसटोचकांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला असून लसीकरण कार्यक्रमांमध्ये अत्यंत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या ४३४ सहाय्यक आरोग्य सेविकांची कायमस्वरुपी पदे मागील ३ वर्षांपासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून प्रत्येक दिवसाला २ याप्रमाणे एकूण ४१४ शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या निकषानुसार १० हजार लोकसंख्येसाठी १ सहाय्यक परिचारिका व ३ आशासेविका आवश्यक आहे, तसेच मुंबईतील २०७ युनिटमध्ये १,४५,४८,२६४ एवढ्या लोकसंख्येसाठी ११५३ केंद्र उपलब्ध असून लसीकरणासाठीच्या ७१९ सहाय्यक परिचारिकांपैकी ४३४ जागा रिक्त असल्यामुळे कोरोना व त्यानंतरच्या गोवर संसर्गासारख्या वेगाने पसरणाऱ्या साथी रोखण्यासाठी वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्यासंदर्भात महानगरपालिका स्तरावरुन कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून फक्त लसीकरणाचे काम होणे शक्य असून प्रत्येक प्रभागात लसीकरणासाठीच्या लाभार्थ्यांची संख्या किती आहे, किती बालके जन्माला आली, त्यापैकी किती जणांचे लसीकरण कोणत्या वेळी आहे, मातांना आरोग्य संदर्भात कोणते प्रश्न आहेत याबाबत सर्वेक्षणाचे काम, तसेच मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य कार्यक्रमांमध्ये लसीकरण, कुटुंब नियोजन, गर्भवती महिला संदर्भांतील आरोग्य मोहिमेचा पाठपुरावा करण्याचे काम ६० टक्के असल्याने सदरहू कामाकरीता कंत्राटी कर्मचाऱ्यांऐवजी पूर्णवेळ वैद्यकीय कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना सुसज्ज आरोग्य सेवा पुरविण्यासाठी महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये कंत्राटी तत्वावर असलेल्या लसटोचकांना सहाय्यक आरोग्य सेविका पदावर कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये व कोविड लसीकरण केंद्रांमध्ये कोविड लसीकरणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २०२१-२२ करीता कंत्राटी पध्दतीने परिचारीकांची (लसटोचक) नियुक्ती करण्यात आली होती.

तसेच, शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार गोवर उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर बाह्य लसीकरण सत्रासाठी प्रतिसत्र मानधनावर लसटोचक अशी नेमणूक करण्यासाठी विविध स्थानिक वृत्तपत्रांत दिनांक २१/१२/२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, सदर जाहिरातीस प्रतिसाद न लाभल्यामुळे कंत्राटी लसटोचकांची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत सहाय्यक आरोग्य सेविका असे पद अस्तित्वात नाही. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये साह्यकारी परिचारीका (प्रसविका) या संवर्गाची ४२१ पदे रिक्त आहेत. सदर पदाच्या कामाच्या स्वरुपात किशोरवयीन मुलांचे आरोग्य, माता व कुटुंब आरोग्य, बाल आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांबाबत उपाययोजना व नियमित लसीकरण या कामांचा समावेश आहे.

(२), (३) व (४) सदर साह्यकारी परिचारीकांची (प्रसविका) ४२१ रिक्त पदे भरण्याकरीता दिनांक ९ जानेवारी, २०२३ मध्ये सर्व स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची छाननी व पडताळणी सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत २७७१ आरोग्य सेविका व १००० आशा सेविका कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त अतिरिक्त ५५७५ आशा सेविकांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कोणतेही धोरण नाही. तथापि, कंत्राटी तत्वावरील लसटोचक साह्यकारी परिचारीका (प्रसविका) व परिचारीका पदांकरीता अर्ज करण्यास पात्र राहतील व गुणवत्तेनुसार त्यांची निवड करण्यात येईल.

तसेच, वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या विविध पदांच्या रिक्त जागा भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील नालेसफाई पावसाळयापूर्वी करण्याबाबत

**(३०) * १७२४३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४२७२ ला दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नालेसफाईकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये निविदा मागविल्या असून निविदा प्रक्रियेला सुरुवात झाली नसल्याने नालेसफाईची कामे उशीरा सुरु होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी नाल्यातील गाळ काढण्याच्या कामांना माहे मार्च, २०२३ मध्ये सुरुवात करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नियोजन असले तरी नालेसफाईच्या कामांची निविदा प्रक्रिया रखडून पावसाळयापूर्वी नालेसफाईची कामे पूर्ण झाली नसल्यास मुसळधार पाऊस, अतिवृष्टीमुळे पुराचा धोका निर्माण होऊन मुंबईकरांना पूरपरिस्थितीच्या समस्यांना सामोरे जावे लागण्याची शक्यता निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील नालेसफाई वेळेवर करण्यासाठी तसेच मुंबईतील दरवर्षी होणाऱ्या पूरस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबईतील शहर, पूर्व व पश्चिम विभागातील मोठे व छोटे नाले तसेच पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गावरील विविध छोटे/मोठे नाले, पेटीका नाले तसेच रस्त्यालगतच्या पर्जन्य जलवाहिन्या व मिठी नदीमधील गाळ काढण्याच्या कामांकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण ३१ निविदा मागविण्यात आल्या असून, सदर निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
(२) व (३) मुंबईतील नालेसफाईची पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे नियमितपणे पावसाळ्यापूर्वी करण्यात येतात. तथापि, नाल्याचा प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक असलेली नालेसफाईची किरकोळ स्वरुपाची कामे पावसाळ्यात करण्यात येतात.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाईच्या कामांकरीता निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, सदर कामे मार्च, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजित आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घणसोली, नवी मुंबई (जि.ठाणे) येथील खाडी किनारी होणारे प्रदूषण रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(३१) * १७४५३ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घणसोली, नवी मुंबई येथील खाडी किनारी अनेक दिवसांपासून विविध आजारावर उपचार करण्यासाठी वापरलेल्या औषधांच्या बाटल्या, इंजेक्शनच्या सुया, गोळ्या तसेच इतर वैद्यकीय जैविक टाकाऊ वस्तूंचा साठा टाकण्यात येत असल्यामुळे ऐरोली, दिवा, घणसोली येथील खाडी किनारी पर्यावरण प्रदूषित होऊन मच्छीमार बांधवांना आरोग्याच्या समस्या उद्भवू लागल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने घणसोली खाडी किनारी वैद्यकीय जैविक टाकाऊ वस्तु टाकणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करुन खाडी किनारी होणारे प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, घणसोली खाडी किनारी औषधाच्या बाटल्या, इंजेक्शन सुया, गोळया इत्यादी जैविक कचरा टाकल्याबाबत वृत्तपत्रामध्ये वृत प्रसिध्द झाले होते. त्याअनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका

कार्यक्षेत्रातील निर्माण जैविक कचरा विहीत पध्दतीने विल्हेवाट लावणेबाबत M/s Mumbai Waste Management Ltd. यांना दक्षता घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाने जाहीर केलेल्या भरती प्रक्रियेत सुसूत्रता आणण्याबाबत

**(३२) * १७०६३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने जाहीर केलेल्या ७५ हजार पदांच्या भरती प्रक्रियेत सुसूत्रता नसल्याने वर्ग-३ व वर्ग-४ पदांची विभागीय भरती प्रक्रिया रखडली असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरहू पद भरती टी.सी.एस. आणि आय.बी.पी.एस. कंपन्यांमार्फत ऑनलाईन परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला असून राज्यातील काही जिल्ह्यांच्या ठिकाणी टी.सी.एस. आणि आय.बी.पी.एस. कंपन्यांची परीक्षा सेंटर नसून रिक्त जागांच्या तुलनेत परीक्षार्थींचे येणारे अर्जाच्या संख्येच्या अनुषंगाने टी.सी.एस. आणि आय.बी.पी.एस. कंपन्यांची क्षमता काही हजारात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भरती प्रक्रियेत सुस्पष्टता आणि पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने कोणकोणत्या संस्थांची निवड केली आहे, त्यांची नावे काय आहेत, सदर भरती प्रक्रिया केव्हापासून राबविण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने जाहीर केलेल्या ७५ हजार पदांच्या भरती प्रक्रियेत सुसूत्रता आणून भरती प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षी आगामी एका वर्षात राज्यातील शासकीय कार्यालयामधील ७५००० पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करण्याचे घोषित केले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) व गट-क व गट- ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोटयातील पदे सरळसेवेने भरताना स्पर्धा परीक्षा प्रक्रिया टि.सी.एस.-आयओएन (टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) व आय.बी.पी.एस (इंस्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपनींमार्फत ऑनलाईन पध्दतीने राबविणेबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय,दिनांक २१ नोव्हेंबर,२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

टि.सी.एस.-आयओएन व आय.बी.पी.एस.या कंपन्यांना स्पर्धापरीक्षा राबविण्यासाठी अधिकची परीक्षा केंद्रे उपलब्ध होण्याचे दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिहान (जि.नागपूर) प्रकल्पाकरीता अधिगृहीत करण्यात आलेल्या खापरी व इतर गावांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३३) * १७२८० श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरमधील मिहान प्रकल्पग्रस्तांकरीता अधिगृहीत करण्यात आलेल्या खापरी व इतर गावातील नागरी समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला (MADC) रुपये ३८.७३ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिहान प्रकल्पाकरीता खापरी, कलकुही, तेल्हारा अशा अनेक गावाच्या जमिनी संपादित केल्या असून सदरहू गावांमध्ये आंतरिक रस्ते, पावसाच्या आणि गावातील पाण्याच्या विसर्गाकरीता पाणी आणि वीज वाहिन्यांचे विद्युतीकरण, पाणीपुरवठा योजना, मलनि:स्सारण योजना इ. कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मिहान (जि.नागपूर) प्रकल्पाकरीता अधिगृहीत करण्यात आलेल्या खापरी व इतर गावांत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

कलकुही (गावठाण), तेल्हारा (गावठाण), दहेगांव (गावठाण) व खापरी (रेल्वे)(गावठाण वगळून) गावांचे पुनर्वसन ४५ हेक्टर क्षेत्रात करण्यात आले. अधिनियमाच्या तरतुदीनुसार पुनर्वसित अभिन्यासात सर्व नागरी सुविधा तयार करण्यात आलेल्या असून, यापैकी ९ प्रमुख नागरी सुविधा जिल्हा परिषद, नागपूर यांना दिनांक ०१/०३/२०१८ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत.

तसेच खापरी (रेल्वे) गावठाणातील धारकांचे पुनर्वसन हे नव्याने करावयाचे असून, खापरी (गावठाण) येथील पात्र प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाकरीता भूखंडाचा २८ हेक्टर क्षेत्रात अभिन्यास तयार करण्यात आला आहे. अभिन्यासात उपलब्ध करुन द्यावयाच्या नागरी सुविधाबाबतची कार्यवाही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीतर्फे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबत

**(३४) * १७३६१ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यासाठी दिनांक १३ जून, २०२२ रोजी घोषणा करण्यात आली असून शासनाने हिवरखेड नगरपंचायतीची अंतिम अधिसूचना निर्गमित करणे अपेक्षित असताना शासकीय अधिकाऱ्यांवर लोकप्रतिनिधींकडून दबाव आणल्यामुळे शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हिवरखेड नगरपंचायत संदर्भात दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थगिती आदेश काढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्थगिती आदेशाविरोधात स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच हिवरखेड विकास मंचातर्फे मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय जनगणना आयोगाने ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रात बदल करावयाचा असल्यास दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पूर्वी करुन घ्यावा, असे निर्देश शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मौ.हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यासाठी अंतिम अधिसूचना निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) शासनाने अकोला जिल्ह्यातील हिवरखेड ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबत दिनांक १३ जून, २०२२ रोजी प्राथमिक उद्घोषणा निर्गमित केली होती. दरम्यान त्यावर नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले असून त्या व्यतिरिक्त मा.लोकप्रतिनिधी यांनी, सदर ग्रामपंचायतीमध्ये राहणारे नागरिक दुर्बल घटकातील असून ९० टक्के लोकांचे उदरनिर्वाह हे शेती व मजूरी यावर निर्भर असल्याने हिवरखेड ग्रामपचांयतीचे अस्तित्व कायम ठेवण्याचे तसेच शासनाने निर्गमित केलेली प्राथमिक उद्घोषणा रद्द करण्याची विनंती केली होती. सदर बाबी विचारात घेऊन शासनाने दिनांक ९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये हिवरखेड नगरपंचायत करण्याबाबतची पुढील कार्यवाही स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

महारजिस्ट्रार, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक २/१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास कळविल्यानुसार सर्व जिल्हे / शहरे / गावे यांच्या प्रशासकीय सीमा जनगणनेकरीता गोठविण्यास दिनांक ३१/१२/२०२२ ऐवजी दिनांक ३०/६/२०२३ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

(४) • शासनाने हिवरखेड नगरपंचायत करण्यासंदर्भात दिनांक १३/६/२०२२ रोजीची प्राथमिक उद्घोषणा रद्द केलेली नाही. केवळ याबाबतची पुढील कार्यवाही स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

• दरम्यानच्या कालावधीत हिवरखेड ग्रामपंचायतीची विद्यमान लोकसंख्या विचारात घेऊन प्रस्तावित हिवरखेड नगरपंचायत ऐवजी नगरपरिषद करण्यासंदर्भात मा.लोकप्रतिनिधी यांनी शासनास दिनांक १९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली असून याबाबत सर्व बाबी तपासून शासनास अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकारी, अकोला यांना दिनांक २०/१/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. शासनास जिल्हाधिकारी, अकोला यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भातील निर्णय घेण्याचे शासनाचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळा (जि.रायगड) बस स्थानकाची पुनर्बांधणी करुन सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) * १७४१४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळा (जि.रायगड) तालुक्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस स्थानकात सोयी-सुविधेअभावी दुरवस्था झाली असून बस स्थानकात जागा अपुरी असल्याने बस चालकांना गाडी चालविताना व वळण घेताना अडचणीचे होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बस स्थानकाच्या दुरवस्थेमुळे शालेय विद्यार्थी, दैनंदिन प्रवासी, राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे चालक व वाहक यांची गैरसोय होत असून सदरहू बस स्थानकांची विनाविलंब पुनर्बांधणी करुन सोयी सुविधांनी सुसज्ज बस स्थानक उभारण्याची मागणी प्रवाशांनी व ग्रामस्थांनी मागील ३ वर्षापासून सातत्याने मा.परिवहन मंत्री, मा.पालकमंत्री, रायगड व विभाग नियंत्रक तळा यांचेकडे निवेदने पाठवून तसेच पाठपुरावा करुन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तळा बस स्थानकाची पुनर्बांधणी करुन सोयी सुविधांनी सुसज्ज बस स्थानक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.
(३) व (४) तळा बसस्थानक बांधून अंदाजे १० वर्ष पूर्ण झालेली आहेत. तसेच बसस्थानक हे सुस्थितीत असल्यामुळे बसस्थानकाची पुनर्बांधणी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवचैतन्य शिक्षण संस्था वडझरी (ता.पाटोदा, जि.बीड) संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयाचे बेकायदेशीर स्थलांतरण झाल्याबाबत

**(३६) * १८२८३ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवचैतन्य शिक्षण संस्था वडझरी (ता.पाटोदा, जि.बीड) संचलित जालना समाजकार्य महाविद्यालय, जालना या महाविद्यालयास सन १९९३-९४ मध्ये मान्यता मिळून सदर महाविद्यालय जालना येथे सुरु झाले असताना सदरहू महाविद्यालय स्थलांतरण करण्यास शासनाची परवानगी न घेता सन २००२-०३ मध्ये सदरहू महाविद्यालय परस्पर मौ.सावरगाव हडप, ता.जि.जालना येथे स्थलांतरित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील बेकायदेशीर हस्तांतरण प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी पुनर्निर्णय घेण्यासाठी प्रकरण शासनाकडे पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेच्या अध्यक्षांनी शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय व कुठलाही पत्रव्यवहार न करता स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर, नियमबाह्यपणे संस्थेचे स्थलांतरण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाची पूर्वपरवानगी न घेता बेकायदेशीररित्या महाविद्यालयाचे स्थलांतरण करणाऱ्या संस्था अध्यक्ष, प्राचार्य, सबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २०/१२/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार या हस्तांतरण प्रकरणी सुनावणीचे आयोजन होणार असून सदर सुनावणीमध्ये, शासनाची पूर्वपरवानगी न घेता बेकायदेशीररित्या महाविद्यालयाचे स्थलांतरण करणाऱ्या संस्था, अध्यक्ष, प्राचार्य, संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करणे इ. बाबी निदर्शनास आणून देण्यात येतील व सुनावणीमधील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील नवनिर्मित नगरपरिषद/नगरपंचायत आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना वेतननिश्चितीचा लाभ देण्याबाबत

**(३७)** * **१७२६६ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील नवनिर्मित नगरपरिषद/नगरपंचायत आस्थापनेत समावेश करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन निश्चित करुन स्थापना दिनांकापासून वेतनाचा लाभ मिळणेबाबतची मागणी राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटना यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नगरपरिषद/नगरपंचायत आस्थापना समावेशन करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन निश्चित करून स्थापना दिनांकापासून वेतनाचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत/ संवर्ग कर्मचारी संघटना यांनी शासनास तसेच आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांच्याकडे दिनांक १७/०१/२०२३ रोजी निवेदन सादर केले आहे.
(२) सदर निवेदनातील मुद्यांची तपासणी व छाननी नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्तरावर करण्याचे शासनाने संचालनालयास कळविले असून सदर तपासणी नगरपरिषद संचालनालय स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहर व हद्दवाढ भागातील गुंठेवारी बांधकाम परवाने प्रलंबित असल्याबाबत

**(३८) * १७५११ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहर व हद्दवाढ भागातील ३ हजार ७०० गुंठेवारी बांधकाम परवाने गत अडीच वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाने गुंठेवारी बांधकाम परवानगीसाठी मोजणी नकाशाचा पर्याय देऊन रोवर मशिनद्वारे मोजणी करुन त्याचा मोबदला सिटी सर्व्हे कार्यालयात भरुन गुंठेवारी भागाची सुरु केलेली मोजणी महानगरपालिका प्रशासनाने थांबवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गत अडीच वर्षांपासून सोलापूर शहर व हद्दवाढ भागातील गुंठेवारी अधिनियमान्वये नियमितीकरणाची प्रलंबित बांधकामे परवानगी प्रकरणे मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, सोलापूर महानगरपालिका हद्दीमध्ये महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ तसेच सुधारणा अधिनियम, २०२१ अन्वये भूखंड नियमाधीन करण्यासंदर्भात महानगरपालिकेकडे मागील अडीच वर्षात २९३६ इतके अर्ज प्राप्त झाले होते. त्यामधील १३२१ इतक्या भूखंड धारकांचे बांधकामे नियमाधीन केले आहेत. सद्य:स्थितीमध्ये १६१५ इतके अर्ज महानगरपालिकेकडे प्रलंबित असून सदरचे अर्ज संबंधित अर्जदारांनी त्यांच्या जागेची मोजणी बाबतची कागदपत्रे सादर न केल्याने प्रलंबित आहेत.

(२) व (३) • शासनाने दिनांक १२/२/२०२० रोजी मंजूर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतूदी गुंठेवारी विकासासाठी लागू असून त्यामधील नियम क्रमांक २/०२/३ (ii) नुसार विकास परवानगीसाठी भूमी अभिलेख विभागाकडील मूळ मोजणी / सिटी सर्व्हे नकाशा, जमीन मालक / विकासक यांच्याकडून नियोजन प्राधिकरणाकडे सादर होणे आवश्यक आहे.

• सदर तरतूदीनुसार मोजणी नकाशा आवश्यक असून महानगरपालिका कार्यालयाकडे मोजणी नकाशा सादर करण्याचे दिनांक १८/४/२०२२ च्या पत्राद्वारे संबंधित अर्जदारास महानगरपालिकेकडून कळविण्यात आले आहे. परंतु अर्जदाराकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

• दरम्यानच्या कालावधी महानगरपालिकेने सदर जागेची मोजणी करण्यासाठी महानगरपालिकेकडून भूमि अभिलेख कार्यालयाकडे रुपये ९ लाख इतकी रक्कम भरुन शहरातील बसवेश्वर नगरमधील शिवराज नगर व संगमेश्वर नगर या २ नगराची मोजणी करुन घेतली आहे. परंतु या २ नगरामधील अर्जदारांचा देखील गुंठेवारी बांधकाम परवानगीकरीता योग्य प्रतिसाद मिळालेला नाही.

• या व्यतिरिक्त महानगरपालिकेने मोजणी नकाशाचा पर्याय देऊन रोवर मशिनद्वारे मोजणी करण्यासाठी दिनांक ३०/३/२०२२ रोजी रोवर मशिन खरेदी केली असून त्याद्वारे मोजणी करण्याची तयारी दर्शविली होती. परंतु या योजनेला देखील अर्जदारांचा मोजणीसाठी प्रतिसाद मिळालेला नाही.

• सदर प्रयोजनासाठी अर्जदारांचा प्रतिसाद मिळालेला नसल्याने त्यांनी प्रतिसाद देऊन महानगरपालिकेकडे मोजणी नकाशा सादर करण्यासाठी संबंधित अर्जदारांना महानगरपालिकेकडून आवाहन करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे महानगरपालिकेच्या सर्व शाळा सुरु करुन मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * १७८०३ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महानगरपालिकेच्या ५९ शाळांपैकी केवळ २० शाळा सुरु असल्यामुळे धुळे शहरातील सर्वसामान्य आणि गरजू विद्यार्थी आगामी काळात शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या शाळा बंद झाल्याने हजारो विद्यार्थ्यांना खाजगी व विनाअनुदानित शाळेत शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळांमध्ये १२ उर्दू माध्यमाच्या व मराठीच्या केवळ ८ अशा एकूण २० शाळा सुरु असून सदरहू शाळांच्या प्रांगणात काटेरी झुडपे तसेच शाळांच्या छतावरील स्लॅब कोसळल्याने विद्यार्थ्यांना धोकादायक परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागत असल्यामुळे शाळांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धुळे महानगरपालिकेतील सर्व ५९ शाळा सुरु करुन तेथे पुरेसे शिक्षक देणे आणि विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, संगणक, बाकडे आणि इमारतीची दुरुस्ती व इतर मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) • सन १९९० पूर्वी धुळे महानगरपालिकेच्या ५९ शाळा सुरु होत्या.

• शासनाने खाजगी शाळांना परवानगी दिल्याने धुळे शहरात मोठ्या प्रमाणात खाजगी शाळा सुरु झाल्या.

• त्यानंतर सन २००७-०८ मध्ये महानगरपालिकेच्या २६ शाळा कार्यरत होत्या.

• पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे कल वाढल्याने व महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी असल्यामुळे भौतिक व शैक्षणिक सुविधांअभावी विद्यार्थी संख्या कमी होत गेली. त्यामुळे महानगरपालिकेच्या शाळांचे टप्प्या-टप्प्याने जवळच्या शाळांत समायोजन करण्यात आले.

- त्यामुळे आज अखेर महानगरपालिकेच्या २० शाळा सुरु आहेत.
- महानगरपालिकेच्या शाळांमध्ये नियुक्त केलेले शिक्षक हे आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारक आहेत. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा कमी नाही.
- महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत पाठ्यपुस्तके पुरविले जातात.
- तसेच, अनुसुचित जाती/जमातीचे विद्यार्थी व सर्व विद्यार्थीनींना शासनाकडून मोफत गणवेश पुरवठा केला जातो.
- महानगरपालिकेच्या काही शाळांमध्ये लोक सहभागातून डिजीटल सुविधाही पुरविण्यात आलेल्या आहेत.
- महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ मधील अंदाजपत्रकात शाळा दुरुस्ती व शाळा विकास याबाबत तरतूद करण्यात येत असून, यामुळे शाळेच्या इमारती व भौतिक बाबींवर अधिक लक्ष देण्याचा प्रयत्न महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-सिंधुदुर्ग "ग्रीन फील्ड कोकण द्रुतगती मार्ग" या महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४०) * १८२३३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १०७७८ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) मुंबई-सिंधुदुर्ग "ग्रीन फील्ड कोकण द्रुतगती मार्ग एक्सप्रेस वे" ४०० कि.मी. लांबीचा महामार्ग प्रकल्प बांधण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचा बृहत आराखडा (डीपीआर) तयार करण्याच्या तसेच सर्वेक्षणाच्या कामास सुरुवात झाली असून दोन वर्षात प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी शासनाने अद्यापपर्यंत किती निधी उपलब्ध करुन दिला आहे, त्यापैकी किती निधी खर्च झाला तर किती निधी शिल्लक आहे, तसेच सदर प्रकल्प केव्हापर्यंत पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई-सिंधुदुर्ग "ग्रीन फील्ड कोकण द्रुतगती मार्ग" या महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पासाठी तांत्रिक अभियांत्रिकी व वित्तीय सुसाध्यता सह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली असून सर्व्हे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रगतीत आहे.

(३) व (४) सदर महामार्गाच्या बांधकामासाठी अंदाजे रुपये ७३,०००/- कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत सविस्तर प्रकल्प तयार करण्यात येत असून अहवालाच्या मंजूरीअंती व निधीच्या उपलब्धतेनुसार कामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती शहरात पाण्याची जीर्ण झालेली पाईपलाईन बदलण्याबाबत

**(४१) * १७८२९ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहरात पाणीपुरवठा करणारी अप्पर वर्धा धरण येथून येणारी मुख्य पाईपलाईन जीर्ण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अमृत २ योजनेंतर्गत स्थानिक प्रशासनाने अंदाजे रुपये ९५० कोटींचा नवीन पाईपलाईन टाकण्याचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव मंजूर करुन अमरावती शहरात नवीन पाईपलाईन टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
मूळ योजनेतील काँक्रिट (PSC) गुरुत्ववाहिनीचे ३० वर्षाचे आयुष्मान सन २०२४ मध्ये संपत असल्यामुळे सद्य:स्थितीस मुख्य पाईपलाईन कमकुवत झालेली आहे.
(२) व (३) अमरावती शहरातील भविष्यातील पाणीपुरवठा प्रकल्पाची आवश्यकता लक्षात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अमृत-२.० अभियानांतर्गत अमरावती शहर पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे व त्याची माहिती केंद्र शासनाच्या पोर्टलवर भरण्यात आलेली असून सदर पाणीपुरवठा प्रकल्प अमृत २.० अभियानांतर्गत किंवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत विचारात घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाची जागा पोलीस वसाहतीस न देण्याबाबत

**(४२) * १६९४५ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे जिल्हा मुख्यालय व शहराच्या ठिकाणी उपलब्ध असलेली जागा उपमहाव्यवस्थापक (बांधकाम) यांनी सर्व विभाग नियंत्रण पत्र क्र.राप/ स्थाअ/ स्थावर/ ५३४७ दिनांक १ डिसेंबर, २०२२ नुसार रिक्त जागा पोलीस वसाहतीस उपलब्ध करुन देण्याबाबत अभिप्राय मागविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळ स्वायत्त महामंडळ असताना महामंडळाच्या उपलब्ध जागेवर राज्य शासनाचा अधिकार असल्याचा दावा करुन सदरहू जागा शासनाच्या ताब्यात घेत असल्याने राज्य परिवहन महामंडळ व त्यातील कर्मचाऱ्यांचे शासनात विलिनीकरण करुन घेण्यात यावे तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्याकरीता वसाहती, विश्रांतीगृहाची सुविधा नसताना सदरहू जागा परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना न देता पोलीस वसाहतीस सदरहू जागा उपलब्ध करुन देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर जागा स्वतः किंवा बांधा वापरा हस्तांतरित तत्त्वावर विकसित करुन लहान मोठ्या उद्योजकांना भाडेतत्त्वावर देण्याचा प्रस्ताव तयार केल्यास मोठ्या प्रमाणात महसूल मिळवून राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा संचित तोटा कमी होण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाची जागा पोलीस वसाहतीस न देण्याबाबतची मागणी सेवाशक्ती संघर्ष राज्य मार्ग परिवहन महामंडळ कर्मचारी संघ यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य मार्ग परिवहन महामंडळाची जागा पोलीस वसाहतीस न देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२), (३), (४), (५) व (६) सेवाशक्ती संघर्ष राज्य मार्ग परिवहन महामंडळ कर्मचारी संघ यांनी निवेदन दिले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जागा पोलीस वसाहतीस देण्याबाबत अद्यापपर्यंत कोणताही निर्णय रा.प. महामंडळातर्फे घेण्यात आलेला नाही.

-----------------

## खोपोली-पाली-वाकण मार्गाची दूरवस्था झाल्याबाबत

**(४३) * १७९६९ श्री.महादेव जानकर, श्री.जयंत पाटील : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक ११४३३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोवा महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असल्यामुळे वाहन चालकांना नेहमीच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी खोपोली पाली वाकण या मार्गाची निर्मिती करण्यात आली असून सदर महामार्गाला मंजुरी मिळाल्यानंतर या मार्गाचे काम १५ वर्षे प्रलंबित असून सुमारे ४० किलोमीटर लांबीच्या या मार्गाचे काम सध्या ९६% पूर्ण झाले आहे, हे खरे आहे, काय,
(२) असल्यास, खोपोली-पाली-वाकण रस्त्याचे काम पूर्ण झालेले असून सदर मार्गाचे उद्घाटन करण्यापूर्वीच या मार्गावर विविध ठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून सदर रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे तसेच सदर मार्गाचे काम पूर्ण करण्यास २०० कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्ग हा मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय म्हणून तयार करण्यात आलेला असून सदर रस्त्याकरीता वन खात्याची परवानगी घेतली गेली नसल्याने उप अभियंता यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने वन खात्याची परवानगी न घेता सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे कामाचे कंत्राट देण्यात आलेल्या महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे. परंतु, सोबतच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे वन खात्याच्या अखत्यारितील जमीनीवर रस्ता दुरुस्तीचे काम करण्यासाठी दिनांक ३१/०५/२०२२ रोजीचे पत्रान्वये परवानगी घेतली आहे.
(४) सदर अस्तित्वातील रस्त्याच्या हद्दीमध्येच (ROW) रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु आहे. सद्य:स्थितीत भुमी अभिलेख विभागाने सर्व्हेक्षण केलेल्या रस्त्याच्या हद्दीतच (ROW) रस्त्याचे काम केले आहे. परंतु, वन विभागाच्या जमिनीबाबत व रस्त्याच्या हद्दीबाबत संभ्रम होत असल्याने, वन विभागातर्फे कार्यवाही करण्यात आली आहे. सदरचा संभ्रम काढण्यासाठी भुमी अभिलेख विभागामार्फत क्षेत्राची हद्द कायम मोजणी पुन्हा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समृध्दी महामार्गावर वन्य प्राण्यांचे होणारे अपघात रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(४४) * १८२३६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समृध्दी महामार्गाच्या वन्यजीव क्षेत्रात भुयारी मार्ग व उड्डाणपुल यांचा अभाव असल्याने वन्य प्राण्यांच्या अपघातात वाढ झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय वन्यजीव संस्थेचा अहवाल येण्याआधीच राज्य रस्ते विकास महामंडळाने सदरहू महामार्गाचे काम सुरु केल्यामुळे तसेच अहवालाच्या योग्यतेची पडताळणी न करताच मंजूर केल्यामुळे वन्यजीवांचा अधिवास धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने अहवालाच्या योग्यतेची पडताळणी न करता मंजूर करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन समृध्दी महामार्गावर वन्य प्राण्यांचे होणारे अपघात रोखण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, वन्यप्राण्यांचे होणारे अपघात रोखण्यासाठी भारतीय वन्यजीव संस्थेच्या (Wildlife Institute of India) शिफारशीनुसार वन्यजीव शमन उपाययोजना (Wildlife Mitigation Measures) कार्यान्वित केलेल्या आहेत. वन्यजीव प्राण्यांकरीता ८ वन्यजीव ओव्हरपास आणि ९२ वन्यजीव अंडरपास आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील झोपड्यांमध्ये चालविल्या जाणाऱ्या अनधिकृत खाद्यगृहांवर कारवाई करण्याबाबत

**(४५) * १७०५० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात नोंदणी नसणारी हजारो अनधिकृत हॉटेल असून प्रसिध्द खाद्यगृहाच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या नावाने झोपडपट्टीमध्ये खाद्यगृह चालविले जात असल्याने मुंबईकरांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत १५००० उपहारगृहे व त्यांच्या तीनपट अनधिकृत उपहारगृहे असून कोरोना काळात यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने अनधिकृत उपहारगृह चालकांकडे क्र.३९४ अंतर्गत परवाना नाही तसेच त्यांच्याकडे अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्रही नसून कित्येक उपहारगृहे झोपड्यांमध्ये चालवली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात कोणतेही उपहारगृह उभारण्यासंदर्भातील माहिती अन्न आणि औषध प्रशासनाकडे नोंदणी व फायर सेफ्टी ऑडिट बंधनकारक असताना सदरहू नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृत हॉटेल व्यवसायिक अन्नाच्या किंमती कमी करण्यासाठी निकृष्ट दर्जाचा भाजीपाला, मसाले, तेल वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील झोपड्यांमध्ये चालवल्या जाणाऱ्या अनधिकृत खाद्यगृहांवर बृहन्मुंबई महानगरपालिका व अन्न व औषध प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टीमध्ये प्रसिध्द खाद्यगृहाच्या नावाशी साधर्म्य साधणाऱ्या नावाने खाद्यगृह चालविले जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण ६८११ अनुज्ञापत्रीत उपहारगृहे आहेत. तथापि, नोंदणी नसणाऱ्या अनधिकृत हॉटेल्सवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ अंतर्गत कारवाई करण्यात येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ३(३) नुसार आस्थापनेचे मालक/भोगवटादार यांनी आस्थापनेमधील अग्निप्रतिबंधक यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतची माहिती प्रपत्र "ब" द्वारे परवानाप्राप्त अभिकरणामार्फत अग्निशमन विभागास माहे जानेवारी व जुलै असे वर्षातून दोनदा सादर करणे बंधनकारक आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

अनधिकृत हॉटेल व्यावसायिक अन्नाच्या किंमती कमी करण्यासाठी निकृष्ट दर्जाचा भाजीपाला, मसाले, तेल वापरत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही, असे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत उपहारगृहांवर माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२२ दरम्यान मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४ अन्वये १५२२ तपासणी अहवाल दाखल करण्यात आले आहेत व १२४७ प्रकरणांमध्ये न्यायालयीन कारवाई करण्यात आली आहे. तसेच, माहे जानेवारी, २०२३ मध्ये २६० तपासणी अहवाल दाखल करण्यात आले आहेत व १४६ प्रकरणांमध्ये न्यायालयीन कारवाई करण्यात आली आहे.

मुंबई अग्निशमन विभागाचे अग्निसुरक्षा प्रमाणपत्र आढळून न आलेल्या तसेच, सदर प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळून आल्यास, अशा उपहारगृहांवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार कारवाई करण्यात येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न आस्थापनांची नियमित व वेळोवेळी तपासणी करुन तसेच अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेऊन त्याअनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते. तसेच तपासणी अहवालातील त्रुटींच्या अनुषंगाने व कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येत आहे, असे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परिवहन विभागाच्या कुर्ला (मुंबई) डेपोतील स्वयंचलित टेस्ट ट्रॅकचे काम रखडल्याबाबत

**(४६) * १७२४४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवी हस्तक्षेपाविना वाहनांची तपासणी करता यावी यासाठी परिवहन विभागाने राज्यात स्वयंचलित वाहन टेस्ट ट्रॅक उभारण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कुर्ला नेहरुनगर डेपोत टेस्ट ट्रॅक उभारण्यात येणारे स्वयंचलित वाहन टेस्ट ट्रॅकचे काम गत चार वर्षांपासून रखडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ट्रॅककरीता सादर करण्यात आलेला प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरीता पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईसह राज्यातील वाहनांची तपासणी मानवी हस्तक्षेपाशिवाय होण्याकरीता व वाहन तपासणीमध्ये होणारी अनियमितता टाळण्यासाठी कुर्ला (मुंबई) डेपोतील स्वयंचलित टेस्ट ट्रॅकला मंजुरी देऊन कालमर्यादेत टेस्ट ट्रॅकचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक २२/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये कुर्ला, मुंबई येथील नेहरुनगर एसटी डेपो येथे ARAI, पुणे या संस्थेमार्फत वाहन निरीक्षक व परिक्षण केंद्र स्थापन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे.

तसेच दिनांक ३०/०९/२०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे रस्ता सुरक्षा निधीतून १० परिवहन कार्यालयामध्ये व दिनांक २४/०६/२०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे १३ परिवहन कार्यालयात वाहन परिक्षण व निरीक्षण केंद्रे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कुर्ला नेहरुनगर डेपोत टेस्ट ट्रॅक उभारण्याबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेकडून स्थापत्य, विद्युत व यंत्र सामग्रीकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या स्थापत्य कामास मंजूरी प्राप्त झाली असून बांधकाम परवानगीसाठी महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून बांधकाम परवानगी मिळण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच मशिनरीची निविदा प्रक्रियेस मान्यता देण्याची बाब कार्यवाहीखाली आहे. तसेच राज्यातील एकूण २३ ठिकाणी वाहन परिक्षण व निरीक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आदिवासी पाड्यात मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४७) * १७७७१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आदिवासी पाड्यात मूलभूत सुविधांच्या विकास कामांचा अभाव असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोपरखैरणे विभागातील अडवली, भूतवली या आदिवासी पाड्यातील शौचालयात गत अनेक महिन्यापासून पाणी नसणे, रस्त्यांच्या दुतर्फा पाईपलाईन मार्गावर डेब्रिजचे डोंगर उभे असणे, स्मशानभूमीची दुरवस्था झाली असणे तसेच अंतर्गत रस्त्यांचीही दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच, आदिवासी पाड्यातील हक्काचे घर मिळण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या अनेक कुटुंबांवर भाड्याच्या घरात राहण्याची वेळ आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू आदिवासी पाड्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच हक्काच्या घरांच्या प्रतिक्षेत असलेल्या कुटुंबांना हक्काची घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

- कोपरखैरणे भागातील आदिवासी बांधवांना अंतर्गत रस्ते, शौचालय, पाण्याची टाकी, स्मशानभूमी इ. सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
- सदर भागात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणीपुरवठा केला जातो. त्यात खंड पडल्यास, शटडाऊन झाल्यास, तसेच, बोअरवेलमध्ये बिघाड झाल्यास, शौचालयात पाणीपुरवठा खंडीत होतो. तथापि, अशी परिस्थिती क्वचित उद्भवते, ही वस्तुस्थिती आहे.

(३) • नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आदिवासी बांधवांसाठी घरकुले बांधून देण्याच्या धोरणास, महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक १६/१०/२००७, ठराव क्र. १८२६ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

- त्यास अनुसरून प्रथम टप्प्यात पुढीलप्रमाणे घरकुले बांधण्यात आलेली आहेत:-

| अ.क्र. | गावाचे नाव | घरकूले |
|---|---|---|
| १ | बेलापूर, आग्रोळी गाव, कातकरी पाडा | ०३ |
| २ | नेरूळ, सेक्टर-९ वाघेपाडा | ०७ |
| ३ | नेरूळ, सेक्टर-११ कातकरीपाडा | ११ |
| ४ | वारलीपाडा,पावणे | ७० |
| ५ | अडवली-भुतवली, कोपरखैरणे | २१ |
| | एकूण | ११२ |

- नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत आदिवासी बांधवांसाठी एकूण ११२ घरकुले बांधण्यात आलेली असून, ती लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली आहेत. उर्वरित बाबत कार्यवाही सुरू आहे.
- नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत कोपरखैरणे, कातकरीपाडा येथील आदिवासी बांधवांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत आहे.
- सदर ठिकाणी ३२०८.०० चौ.मी. भूखंडावर ५ रहिवास इमारत व १ बालवाडी इमारत प्रस्तावित आहे.
- यामध्ये तळमजला +२ मजल्यांच्या दोन इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असून, २४ सदनिका बांधून तयार आहेत. सदर सदनिकांचा ताबा लाभार्थ्यांना देणे महानगरपालिका स्तरावर प्रस्तावित आहे.
- उर्वरित १ बालवाडी व ३ रहिवासी इमारतींचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.

(४) • वन हक्क कायदा, २००६ च्या अंमलबजावणीकरीता राज्यस्तरीय संनियंत्रण समितीच्या दिनांक ११/०१/२०२२ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या ठराव क्र. २०००, दिनांक ०४/०३/२०२२ अन्वये विभाग निहाय ७ वन हक्क समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

- सदर समितीच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या वस्त्यांना प्रत्यक्ष भेट देऊन समस्या जाणून घेण्यात आलेल्या आहेत. तसेच, एकही आदिवासी वस्ती नागरी सोयी सुविधांपासून वंचित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घेण्यात येणार असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४८) * १७०५९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाला दिल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने रुपये ५८०० कोटी खर्चाच्या रस्ते कामाच्या निविदा मागविल्या असून निविदांना अत्यल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी निविदा रद्द करण्यात आल्या, तद्नंतर सदरहू कामांसाठी दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी नव्याने रुपये ६०७८ कोटींच्या निविदा मागविण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी सदर निविदा उघडण्यात येवून कामासाठीचे कंत्राटदार निश्चित करण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील काँक्रिटीकरणासाठी मंजूर करण्यात आलेल्या ५५१ रस्त्यांपैकी केवळ ३५२ रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे सुरु असून उर्वरित १९९ रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे प्रलंबित असल्यामुळे मुंबई शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकूण लांबीच्या रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामांची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे नियोजित वेळेत काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ३९७ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामासाठी दिनांक २५/११/२०२२ रोजी एकूण ५ निविदा मागविण्यात आल्या असून, सदर कामांकरीता कंत्राटदार निश्चित करुन दिनांक १८/०१/२०२३ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सद्य:स्थितीत रस्त्यांची सुरु असलेली कामे ही सन २०२१-२२ मध्ये दिलेल्या कार्यादेशामधील असून, त्याअंतर्गत सध्या एकूण ४६० रस्त्यांची कामे हाती

घेण्यात आली आहेत. त्यापैकी ३९१ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असून, ६९ रस्त्यांची कामे वाहतूक पोलिसांची परवानगी मिळाल्यानंतर हाती घेण्यात येणार आहेत. सदर प्रकरणी पाठपुरावा करुन उर्वरित रस्त्यांच्या कॉँक्रिटीकरणाची कामे लवकरात लवकर करण्यात येणार आहेत.

कॉँक्रिटीकरणाची कामे सुरु असताना वाहतूक पोलिसांमार्फत वाहतुकीचे नियमन केले जाते. तसेच वाहतूक सुरळीत राहावी याकरीता संबंधित कंत्राटदारामार्फत ट्रॅफिक वॉर्डन ठेवले जातात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात तालुका स्तरावर सोयाबीन हमीभाव खरेदी विक्री केंद्र सुरु करण्याबाबत

**(४९) * १७२८३ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सन २०२२-२०२३ करीता सोयाबीन पिकाचा हमीभाव रुपये ४३०० प्रति क्विंटल घोषित केला असल्याचे दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात हमीभाव खरेदी केंद्र सुरु न झाल्यामुळे शेतकऱ्यांना रुपये ३००० प्रति क्विंटल या दराने सोयाबीन विकावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या हमीभाव धोरणाच्या अनुषंगाने राज्यात तालुका स्तरावर सोयाबीन हमीभाव खरेदी विक्री केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र शासनाने खरीप हंगाम २०२२-२०२३ साठी शेतीमालाच्या जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीमध्ये सोयाबीनसाठी रुपये ४३०० प्रति क्विंटल हमीभाव निश्चित केलेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

हंगाम २०२२-२३ मध्ये हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी दिनांक ०४/११/२०२२ पासून शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी आणि प्रत्यक्ष खरेदी दिनांक १०/११/२०२२ पासून सुरु केली होती. यासाठी एकूण ३६९ खरेदी केंद्रे सुरु करण्यात आलेली होती. हमीभावाने खरेदीसाठीच्या ९० दिवसाच्या कालावधीत फक्त ३७४ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, संपूर्ण खरेदी कालावधीत सोयाबीनची खरेदी झालेली नाही. सोयाबीनचे बाजारभाव रुपये ५७००-५५०० प्रति क्विंटल हे हमीभाव रुपये ४३०० प्रति क्विंटल पेक्षा जास्त असल्याने, खरेदीसाठी सुरु केलेल्या ३६९ खरेदी केंद्रावर सोयाबीनची खरेदी झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कमारे (जि.पालघर) येथील पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या आदिवासी नागरिकांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(५०) * १७०७८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कमारे (जि.पालघर) येथील बंधाऱ्याचे काम लघु पाटबंधारे योजनेंतर्गत ९० टक्के पूर्ण झालेले असताना पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या आदिवासी नागरिकांना पर्यायी जागा शासनाकडून उपलब्ध न झाल्याने सदर प्रकल्पाचे कोट्यवधीचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर येथील मौजे कमारे लघु पाटबंधारे योजनेंतर्गत प्रकल्पाबाधित होणाऱ्या आदिवासींना पर्यायी जागा उपलब्ध होत नसल्याने दोन वर्षांपासून बंधाऱ्याचे काम रखडले असल्यामुळे येथील ग्रामस्थांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री, पालघर जिल्हा, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग व जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मौजे कमारे येथील पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या आदिवासी नागरिकांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यासह पाटबंधारे प्रकल्पाचे रखडलेले काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

लघुपाटबंधारे योजना कमारे या प्रकल्पाचे घळभरणी व्यतिरिक्त काम पूर्ण झालेले आहे. धरणाच्या बुडीत क्षेत्रात वनपट्टे येत असल्याने वनपट्टेधारकांना पर्यायी जमीन देण्याची कार्यवाही चालू आहे. वनपट्टेधारकांना पर्यायी जमीन उपलब्ध झाल्यानंतर प्रकल्पाचे उर्वरित काम पूर्ण करण्याचे विभागाचे नियोजन आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) लघुपाटबंधारे योजना कमारे या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात वनपट्टे येत असल्याने सदर वनपट्टेधारकांना मौजे टोकराळे येथील स.नं. /ग.नं. ३३ क्षेत्र २०/९३/०० हे. आर जमीन उपलब्ध करुन देण्यासंदर्भात महसूल व वन विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. महसूल व वन विभागाकडून वनपट्टेधारकांना पर्यायी जमीन उपलब्ध झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे उर्वरित काम पूर्ण करण्याचे विभागाचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये नवजात शिशुंच्या रक्ताची तपासणी करण्याबाबतची यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(५१) * १८३०२ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये नवजात शिशुंच्या रक्ताची तपासणी होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या रुग्णालयात व्यंग तपासणीची सोय नसल्याने गोरगरिब नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगांव, जिजामाता, भोसरी, आकुर्डी या चार रुग्णालयांसह वायसीएम हे मोठे रुग्णालय असूनही सदरहू रुग्णालयांमध्ये नवजात शिशुंच्या रक्ताची तपासणी करण्याची सोय नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये नवजात शिशुंच्या रक्ताची तपासणी करण्याबाबतची यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) नवजात शिशुंच्या रक्ताची विशिष्ट प्रकारची चाचणी व्यंग तपासणीसाठी आवश्यक असते. अशा प्रकारच्या काही चाचण्या रूग्णालयात केल्या जात नाही, हे खरे आहे.
(३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रूग्णालयामध्ये आवश्यकतेनुसार नवजात शिशुंच्या रक्ताची तपासणी करण्यात येते. तथापि, जन्मजात हायपोथायरॉईडीझम, G६PD कमतरता, जन्माजात एड्रेनलहायपरप्लासिया, टायरोसिनमिया, मॅपलसिरपमूत्ररोग, गॅलेक्टोसेमिया, फेनिलकेटोन्युरिया या विशिष्ट आजाराची चाचणीची सोय महानगरपालिकेत नाही हे खरे आहे.
(४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रूग्णालयांमध्ये अंदाजे दरवर्षी १५००० बालके जन्माला येतात.

या विशिष्ट प्रकारच्या तपासण्याकरीता आवश्यक यंत्रसामग्रीची प्राथमिक गुंतवणूक मोठी असल्याने ती देशात मोजक्याच ठिकाणी उपलब्ध आहे.

या सर्व बालकांची सरसकट तपासणी करणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसल्याने, फक्त ज्या बालकांच्या आई-वडील किंवा भावंडामध्ये व्यंग किंवा आजार आढळून आले आहेत किंवा ज्या बालकांचे भावंडाचे निदान न होता अज्ञात वैद्यकीय कारणाने मृत्यू झालेला आहे, अशाच बालकांची वरील आजाराकरीता रक्ताची विशेष चाचणी खाजगी पॅथॉलॉजी लॅबमधून करण्यात येते. या चाचण्या आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसल्याने महानगरपालिकेमार्फत केल्या जात नसल्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये जेनेरिक औषधांचे विक्री परवाने राज्यांतर्गत संस्थांना देण्याबाबत

**(५२) * १८३१० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिकांच्या रुग्णालयांमध्ये जेनेरिक औषधांचे दुकान सुरु करण्याचे अधिकार राज्याबाहेरील असलेल्या नॅशनल फेडरेशन ऑफ फार्मर्स प्रोक्यूअरमेंट प्रोसेसिंग ॲड रिटेलिंग को. ऑपरेटिव्ह ऑफ इंडिया या संस्थेला देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेला औषधांचे दुकान सुरु करण्यासाठी महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्येच जागा उपलब्ध करुन तेथे त्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत, तसेच संस्थेशी करारनामा करण्याचे व सुरु करण्यात आलेली औषधांची दुकाने २४ तास सुरु ठेवण्याचे महानगरपालिकेला व नगरपालिकेला बंधनकारक करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नॅशनल फेडरेशन ऑफ फार्मर्स प्रोक्यूअरमेंट प्रोसेसिंग अँड रिटेलिंग को. ऑपरेटिव्ह ऑफ इंडिया या संस्थेने औषधांचा पुरवठा करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, राज्यातील महानगरपालिका व नगरपालिकांच्या रुग्णालयांमध्ये औषधांचा पुरवठा करण्याचे काम राज्यात अनेक वर्ष औषध विक्रीमध्ये काम करत असलेल्या राज्यातील संस्थांना परवानगी देण्याबाबत किंवा निविदा प्रक्रिया राबवून राज्यांतर्गत काम करणाऱ्या संस्थांनाही संधी उपलब्ध करुन देण्याची मागणी विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी पत्राद्वारे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर निर्णय रद्द करुन अनेक वर्ष औषध विक्रीचे काम करणाऱ्या राज्यातील संस्थांना परवानगी देण्याबाबत किंवा निविदा प्रक्रिया राबवून राज्यांतर्गत काम करणाऱ्या संस्थांना जेनेरिक औषधांचे दुकान सुरु करण्याची संधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) • मा.मंत्री मंडळाच्या मान्यतेने नॅशनल फेडरेशन ऑफ फार्मर्स प्रोक्यूअरमेंट प्रोसेसिंग ॲण्ड रिटेलिंग को. ऑपरेटिव्ह ऑफ इंडिया (नॅकोफ इंडीया लिमी.) या केंद्र शासन अंगीकृत बहुराज्यीय संस्थेस नगरविकास विभाग, शासननिर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१३७/नवि-२०,दिनांक ०२/०२/२०२३ मधील अटी व शर्तीच्या अधीन राज्यातील नागरी स्वराज्य संस्थाद्वारे चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांच्या परीसरात जेनेरीक औषधी दुकान सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

- उक्त शासननिर्णयानुसार संबंधित महानगरपालिका आयुक्त/ नगरपालिका मुख्याधिकारी यांनी स्थापन केलेल्या समितीने ठरविलेल्या अटी व शर्तीच्या आधारे या संस्थेला जागा वितरीत करण्यात येणार आहे.
- या दुकानांमध्ये ब्रॅण्डेड औषधीच्या दर्शनी मुल्यावर ५% इतकी सवलत ग्राहकांना देण्यात येणार आहे.
- सदर दुकाने २४ तास सुरु असणार आहेत.
- तथापि, या संस्थेने औषधांचा पुरवठा करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केलेला नाही.

(४) सदर पत्र प्राप्त झालेले नाही, तथापि, मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अपर मुख्य सचिव, नगरविकास विभाग यांना अग्रेषित केलेले दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२३ रोजीचे पत्र या विभागास दिनांक १६/०२/२०२३ रोजी प्राप्त झाले आहे. सदर पत्र योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

(५) व (६) वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकिय/दंत महाविद्यालये, तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय रुग्णालयांतर्गत उपलब्ध बांधकामातील योग्य जागेत महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झुमर्स फेडरेशन लि.मुंबई या शासनमान्य राज्यस्तरीय सहकारी संस्थेस औषधी दुकानांसाठी जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.